❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | सोमवार, दि. १४ सप्टेंबर २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २६० ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

आस लागली तुझ्या दर्शनाची
तुला डोळे भरून पाहण्याची,
कधी उजाडेल ती सोनेरी पहाट
गणराया तुझ्या आगमनाची !!
गणपती बाप्पा मोरया...!

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



# देखरेख प्रणाली विकसित करणार : मुख्यमंत्री

## राज्यातील चॅरिटेबल ट्रस्टच्या शाळांबाबत पाऊल

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्रातील सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्टद्वारे चालविल्या जाणाऱ्या शाळांमध्ये शिक्षण हक्क कायद्याची (RTE) प्रभावी व पारदर्शक अंमलबजावणी व्हावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे.

राज्यातील अशा सर्व अनुदानित आणि विना अनुदानित शाळांवर नियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी मानक कार्यप्रणाली, संनियंत्रण आणि मूल्यमापन यंत्रणा तातडीने विकसित करावे. धर्मदाय रुग्णालयातील कार्यपद्धतीप्रमाणे धर्मदाय संस्था अंतर्गत कार्यरत शाळांमध्ये शिक्षण हक्क कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी देखरेख कार्यपद्धतीची कायदेशीर प्रक्रिया वेगाने पूर्ण करावी. महाराष्ट्रामध्ये सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर शाळांचे संचालन केले जाते. या शाळांमध्ये शिक्षण हक्क कायद्यांतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकांतील मुलांना प्रवेश मिळणे अनिवार्य आहे. मात्र, या शाळांमधील पारदर्शकता आणि नियमावलीच्या अंमलबजावणीबाबत वारंवार तक्रारी समोर येत होत्या. या पार्श्वभूमीवर, राज्यातील सर्व गरजू आणि पात्र विद्यार्थ्यांना आरटीई कायद्याचा प्रत्यक्ष लाभ मिळावा आणि शिक्षणाचा दर्जा कायम राहावा, यासाठी एक आधुनिक व डिजिटल प्रणाली अस्तित्वात आणणे अत्यावश्यक आहे. सार्वजनिक 'चॅरिटेबल ट्रस्ट'द्वारे चालविल्या जाणाऱ्या रुग्णालयांमध्ये गरीब रुग्णांना मोफत व सवलतीच्या दरात आरोग्य सुविधा मिळतात की नाही, यावर नियंत्रण यंत्रणेद्वारे देखरेख ठेवली जाते, त्याच धर्तीवर आता शाळांसाठीही ही यंत्रणा लागू केली जाणार आहे.




मुख्यमंत्र्यांच्या या विशेष प्रयत्नांमुळे राज्यातील हजारो शाळांमधील प्रवेश प्रक्रिया, शैक्षणिक सोयी-सुविधा आणि आरटीई अंतर्गत मिळणाऱ्या निधीचा योग्य वापर यावर थेट प्रशासकीय लक्ष राहील. तसेच या यंत्रणेद्वारे शाळांचा नियमित आढावा घेणे शक्य होणार असून, गैरप्रकारांना आळा बसण्यास मोठी मदत होणार आहे. ही प्रणाली लवकरात लवकर कार्यान्वित करण्यासाठी विधि व न्याय विभाग, आवश्यक ते तांत्रिक तज्ज्ञ यांच्यामध्ये योग्य तो विचारविनिमय करून एक सर्वसमावेशक प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हा प्रस्ताव तयार झाल्यानंतर त्याला आवश्यक त्या आर्थिक मंजुऱ्या देऊन तातडीने अंमलबजावणी सुरू केली जाणार आहे.

## आंदोलन करणं संयुक्तिक नाही : प्रवीण दरेकरांचे जरांगेंना आवाहन

■ मुंबई (दै. संध्या)

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेत मुंबईकडे प्रस्थान करण्याची घोषणा केली आहे. 15 सप्टेंबरला ते आंतरवालीतून निघणार असून आझाद मैदानात उपोषण करणार आहेत. त्यांच्या या घोषणेनंतर राज्यातील राजकीय वातावरण तापले असून, आता भाजपचे नेते प्रवीण दरेकर यांनी यावर सावध आणि सूचक प्रतिक्रिया दिली आहे. सध्या गणेशोत्सवाचे दिवस असल्याने सणासुदीच्या काळात आंदोलन करणे कोणत्याही अर्थाने संयुक्तिक ठरणार नाही, असा सल्ला दरेकर यांनी जरांगे पाटील यांना दिला आहे. मनोज जरांगे यांच्या आंदोलनाबाबत बोलताना प्रवीण दरेकर म्हणाले की, "सध्या सणासुदीचे दिवस आहेत. लोक सण आणि उत्सव साजरे करण्यात मग्न आहेत. अशा आनंदाच्या वातावरणात आपल्या कोणत्याही आंदोलनामुळे सणासुदीचे वातावरण खराब होऊ नये किंवा त्याला गालबोट लागू नये. सणांच्या काळात मुंबई पोलिसांवर बंदोबस्ताचा मोठा ताण असतो, याचे भान आंदोलकांनी राखले पाहिजे."

दरेकर यांनी पुढे छत्रपती शिवाजी महाराजांचा संदर्भ देत जरांगे पाटील यांना आवाहन केले. ते म्हणाले, "आपण सर्वजण छत्रपती शिवाजी महाराजांना मानणारे लोक आहोत. त्यामुळे हिंदूंचे सण, उत्सव आणि परंपरा यांच्यामध्ये महाराजांचे शिवभक्त आणि पाईक म्हणून कोणताही व्यत्यय येणार नाही, याची आपण काळजी घेतली पाहिजे." सणासुदीच्या या काळात लोकांची गैरसोय होऊ नये आणि उत्सवाचा आनंद कायम राहावा, अशीच सर्वांची अपेक्षा असल्याचे दरेकर यांनी स्पष्ट केले. ते एका वृत्तवाहिनीशी बोलत होते. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी 15 सप्टेंबरपासून 'मुंबई चलो' आंदोलनाची हाक देणारे मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा राज्य सरकार आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर जोरदार हल्ला चढवला आहे. सरकारला गोरगरिबांची अजिबात कदर नाही. आम्ही सरकारला तब्बल 3 वर्षे संधी दिली. आता काय व्हायचे ते मुंबईतच होणार, आम्हाला जेलमध्ये टाकले तरी चालेल, पण हे आंदोलन आता थांबणार नाही, असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला.




## थोडक्यात...

### शहांनी १०० गाड्यांचा ताफा घेऊन फिरू नये

मुंबई : दैनिक संध्या

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या मुंबई दौऱ्यावरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते संजय राऊत यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे. "अमित शाह हे मुंबईत केवळ फंड कलेक्शनसाठी येतात. मुंबईत बिल्डर, जमिनीचे व्यवहार करणारे लोक आणि हजारो कोटींच्या थैल्या असल्याने ते येथे रमतात," असा गंभीर आरोप राऊत यांनी केला आहे. सोबतच मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा देत, त्यांच्या भाषेवर आक्षेप घेणाऱ्या राज्य सरकारचा राऊत यांनी चांगलाच समाचार घेतला. अमित शाह यांच्या दौऱ्यामुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीकडे लक्ष वेधताना राऊत म्हणाले की, "मुंबई ही गजबजलेली आहे. सणासुदीत लोकांना बाहेर पडावे लागते. अशा वेळी गृहमंत्र्यांनी १०० गाड्यांचा ताफा घेऊन फिरू नये. मुंबईतील लोक पापभिरू आहेत, ते कुणालाही हात लावत नाहीत. तुम्ही १-२ गाड्या घेऊन फिरलात तरी तुम्हाला काही होणार नाही. तुम्ही असे काही महान राष्ट्रकार्य केलेले नाही की आंतरराष्ट्रीय शक्ती तुमच्या जीवावर उठलेल्या आहेत." तसेच, शाह लालबागच्या राजासोबतच उद्योगपतींच्या गणपतीच्या व्यवस्थेसाठी थांबले आहेत का, असा खोचक सवालही त्यांनी उपस्थित केला.

### निधीच मिळणार नसेल तर सत्ता कशी येणार?

नंदुरबार : दैनिक संध्या

पक्षाचा कार्यकर्ता कोणत्या नेत्यांच्या घरी जेवनासाठी येत नाही. त्यांची अपेक्षा असते की आपल्या गावातील कामे झाली पाहिजेत. नंदुरबारमध्ये आमशा पाडवी आणि मी दोघे शिवसेनेचे आमदार आहोत, पण शिवसैनिकांना न्याय देऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे, अशी खंत शिवसेनेचे आमदार आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी मंत्री उदय सामंत आणि गुलाबराव पाटील यांच्यासमोर बोलताना व्यक्त केली आहे. आमदार चंद्रकांत रघुवंशी म्हणाले की, जिल्ह्यात सत्ताधारी पक्षाचे विधानसभेचे 3 आमदार आहेत त्यामध्ये शिवसेनेचा 1 तर भाजपचे दोन आमदार आहेत. 20 टक्के प्रत्येक आमदारांना दिला जातो पालकमंत्र्यांना 30 तर उरलेल्या 10 टक्क्यांमध्ये सर्व पक्षाचे सर्व नेते आहेत. माझी मंत्र्यांना विनंती आहे की केवळ विधानसभेसाठी पैसे देऊ नका, तुम्ही पक्षाला निधी द्या. आमच्यात मतभेद नाही. पण 17 जिल्हा परिषद सदस्यांच्या मतदारसंघात जर निधीच दिला नाही तर शिवसेनेची सत्ता येईलच कशी असा सवाल रघुवंशी यांनी केला आहे. आमदार चंद्रकांत रघुवंशी म्हणाले की, आमची ताकद आहे पण कार्यकर्त्यांच्या मतदारसंघात कामे झाली पाहिजेत, निधीवाटपाबद्दल मंत्र्यांनी फेर विचार करावा. जिल्ह्यात पक्ष संघटना वाढत नाही त्यांचे एकमेव कारण हेच आहे. भाजपचे दोन आमदार आहेत त्यांच्याकडे भरपूर निधी आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचा एकही आमदार नाही पण पालकमंत्र्यांकडे 30 टक्के निधी आहे, अशा वेळेस शिवसेनेला काहीच मिळत नाही.

## भारताचा पंतप्रधान पाकिस्तानात घुसून मारेन : गृहमंत्री अमित शहा

■ मुंबई (दै. संध्या)

गृहमंत्री अमित शहा यांनी रविवारी मुंबईत सांगितले की, पंतप्रधान मोदींनी प्रत्येक क्षेत्रात बदल घडवून आणण्याचे काम केले आहे. आधी कोण विचार करू शकले असते की, दहशतवादी हल्ल्याच्या स्थितीत भारताचे पंतप्रधान पाकिस्तानच्या सीमेत घुसून प्रत्युत्तर देण्यास तयार असतील? सर्जिकल स्ट्राइक असो, एअर स्ट्राइक असो किंवा ऑपरेशन सिंदूर असो, आपले नेते नरेंद्र मोदी यांनी अशी संरक्षण नीती तयार केली आहे की, ज्यामुळे भारतावर हल्ला करण्याचा विचार करताच आपल्या शत्रूंना दोनदा विचार करावा लागतो. अमित शहा मुंबईत ५२व्या इंडिया जेम अँड ज्वेलरी अवॉर्ड्स समारंभात सहभागी झाले होते. त्यानंतर त्यांनी भाजपच्या सेवा संकल्प अभियानाचे उद्घाटन केले. शहा यांनी पत्रकार परिषदेत सरकारच्या उपलब्धीही सांगितल्या. केंद्र सरकारने गेल्या 12 वर्षांत मूलभूत बदल केले आहेत. यामुळे भारत 2014 मध्ये 'फ्रॅजाइल फाइव्ह' अर्थव्यवस्थांमध्ये समाविष्ट होण्यापासून बाहेर पडून आज जगातील शीर्ष पाच अर्थव्यवस्थांमध्ये पोहोचला आहे. 2014 मध्ये भारताची गणना 'फ्रॅजाइल फाइव्ह'मध्ये केली जात होती, परंतु आज तो जगातील टॉप 5 अर्थव्यवस्थांमध्ये समाविष्ट आहे. 2047 पर्यंत भारत प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर राहील: भारताने जीडीपीमध्ये 7.8% वाढ नोंदवली आहे आणि प्रमुख देशांमध्ये सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था बनला आहे. पंतप्रधान मोदींनी लोकांमध्ये हा विश्वास निर्माण केला आहे की, 15 ऑगस्ट 2047 पर्यंत भारत प्रत्येक क्षेत्रात जगातील सर्व देशांपेक्षा पुढे असेल. पायाभूत सुविधा, उत्पादन आणि निर्यातीत सरकारने खूप काम केले आहे. यात उत्पादन-संबंधित प्रोत्साहन (PLI) योजनांचाही समावेश आहे. ते म्हणाले की भारताची निर्यात सातत्याने जुने विक्रम मोडत आहे.



## पोलिसांनी आझाद मैदानात मोर्चाची परवानगी नाकारली

### जरांगे पटील म्हणाले- जेलमध्ये टाकले तरी आता माघार नाही, १५ सप्टेंबरला मराठे मुंबईत धडकणारच

■ आंतरवाली सराटी (जालना) (दै. संध्या)

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी 15 सप्टेंबरपासून 'मुंबई चलो' आंदोलनाची हाक देणारे मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा राज्य सरकार आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर जोरदार हल्ला चढवला आहे. सरकारला गोरगरिबांची अजिबात कदर नाही. आम्ही सरकारला तब्बल 3 वर्षे संधी दिली. आता काय व्हायचे ते मुंबईतच होणार, आम्हाला जेलमध्ये टाकले तरी चालेल, पण हे आंदोलन आता थांबणार नाही, असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला.

दरम्यान, जरांगे पाटील यांनी 19 सप्टेंबरला मुंबईतील आझाद मैदानावर आमरण उपोषण करण्यासाठी परवानगी मागितली होती. आंदोलन शांततेच्या मार्गाने आणि पोलिसांनी घातलेल्या सर्व अटी-शर्तींचे पालन करून करण्याचे हमीपत्रही देण्यात आले होते. मात्र, आझाद मैदान पोलिसांनी ही परवानगी नाकारली आहे.

दक्षिण मुंबईतील शाळा, रुग्णालये, व्यवसाय, न्यायालयीन कामकाज, सार्वजनिक वाहतूक आणि आरोग्य व्यवस्थेवर परिणाम होऊन सार्वजनिक सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. याशिवाय गणेशोत्सवाच्या काळात मुंबईत मोठी गर्दी असते आणि सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांवर अतिरिक्त जबाबदारी असते. यापूर्वीच्या जरांगे आंदोलनादरम्यान मोठ्या संख्येने आंदोलक मुंबईच्या रस्त्यावर उतरल्याने वाहतुकीवर परिणाम आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याचा दाखलाही पोलिसांनी दिला आहे. त्यामुळे यावेळी आझाद मैदानातील आंदोलनाला परवानगी नाकारण्यात आली आहे.



#### बावनकुळे सावध राहा- जरांगे

भाजप नेत्यांवर टीका करताना जरांगे म्हणाले, "बावनकुळे तुम्ही सावध राहा, ते बाईच्या पदराआडून डाव टाकत आहेत. प्रसाद लाड यांच्यामुळे बावनकुळे तुम्हाला सोडले होते. एरवी शेतकरी गेल्यावर 'सुट्टी आहे' सांगणारे अधिकारी आता शनिवारी-रविवारीही काम करू लागले आहेत. आंदोलनाच्या काळातच या चौकशा का सुरू झाल्या, हे संपूर्ण महाराष्ट्राला कळत आहे. सहकाऱ्यांवरील चौकशीच्या ससेमिऱ्याबाबत बोलताना ते म्हणाले की, "तुम्ही कितीही चौकशा करा, मला काही फरक पडत नाही. मी सहकाऱ्यांना आधीच सांगितले होते की तुमच्या मागे चौकशा लागतील, भीती वाटत असेल तर मला सोडा; पण ते सोबत राहिले. मला आणि माझ्या सहकाऱ्यांना माझा समाज तुकडे घालेल, सांभाळून घेईल."

जय गणेश



ज्येष्ठेभ्यो ज्येष्ठराजाय ज्येष्ठपदप्रदायिने महोदराय पूर्णाय पूर्णानंदाय ते नमः

दैनंदिन कार्यक्रमः
श्रींचे आगमन मिरवणूक (मयूर रथ) -
दि. १४ सप्टेंबरः स. ८.३० वा. मंदिरापासून
श्रींचे दैनंदिन अभिषेक/महापूजाः
दि. १५ सप्टेंबर ते २४ सप्टेंबर स. ७ ते सायं. ५
गणेशयाग (उत्सव मंडप):
शुभारंभ - १४ सप्टेंबर - दु. १ वा.
दि. १५ ते १८ सप्टेंबर स. ८ ते १२, दु. १ ते ५
श्री हरी जागर-समस्त वारकरी बंधूः
दि. १५ सप्टेंबरः रात्री १० ते २
सामूहिक सूर्य नमस्कारः दि. १६ सप्टेंबरः स. ६
सामूहिक अग्नीहोत्रः दि. १७ सप्टेंबरः पहाटे ५.३०
मंत्र जागर (एकादशी): दि. २२ सप्टेंबरः दुपारी ४
सत्यविनायक पूजाः दि. २४ सप्टेंबरः सायं.५ ते ७
महिला हळदी-कुंकूः दि. २४ सप्टेंबरः सायं.७ ते ८
"श्री वक्रतुंड" रथातून
श्रींची भव्य विसर्जन मिरवणूक
दि. २५ सप्टेंबर २०२६ - दु. ४ वाजता

जय गणेश
श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे
जय गणेश
सर्व गणेशभक्त बंधू-भगिनींना सस्नेह निमंत्रण - गणेशोत्सव २०२६
'श्रीं'ची प्राणप्रतिष्ठापना आज सोमवार दि. १४/०९/२०२६ सकाळी ११.११ वा.
वर्ष १३४वे
श्री हित मोहित मराल गोस्वामीजी महाराज, श्री राधावल्लभ मंदिराचे १८वे तिलकायत अधिकारी, वृंदावन, उ.प्रदेश
देखाव्याच्या विद्युत रोषणाईचे उद्घाटनः "प्रेम मंदिर, वृंदावन" सायं. ७ वाजता
मा.ना.मुरलीधर मोहोळ, नागरी उड्डाण व सहकार राज्यमंत्री, भारत सरकार यांच्या शुभहस्ते
गणेशयाग शुभारंभः आज दि. १४ सप्टेंबर, दुपारी १ वाजता
शुभहस्तेः परमपूज्य श्री.श्री.१००८ श्री महंत आचार्य संगीत कृष्ण सांवरिया बाबा,
अध्यक्ष, अखिल भारतीय चतुर संप्रदाय, गोवर्धन, मथुरा
ऋषि पंचमीः दि. १५ सप्टेंबर, पहाटे ६ वाजता महिलांचे अथर्वशीर्ष पठण
प्रमुख पाहुणेः मा.सौ.मंजुषाताई दीपक नागपुरे, महापौर, पुणे, मा.सौ.शीतल तेली-उगले, विभागीय आयुक्त, पुणे


श्री हित मोहित मराल गोस्वामीजी महाराज

भारतीयांचे श्रध्दास्थान आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या या मंगलमूर्तीचा वैभवशाली उत्सव आज सोमवार दि. १४ सप्टेंबर ते शुक्रवार दि. २५ सप्टेंबर २०२६ पर्यंत दत्त मंदिर समोरील, बुधवार पेठ येथील पारंपारिक जागेत संपन्न होत आहे. अथर्वशीर्ष आवर्तने, महाभिषेक पूजा, गणेशयाग, हरीजागर, सत्यविनायक असे पवित्र धार्मिक विधी यावेळी संपन्न होणार आहेत. या सोहळ्यात सर्व भाविकांनी सहभागी होऊन हा पवित्र उत्सव आनंदाने पार पाडवयाचा आहे. आपल्या चरणी विनम्र प्रार्थना की आपण 'श्रीं'च्या या पवित्र उत्सव सोहळ्यात सहभागी होवून दर्शन - प्रसादाचा लाभ घ्यावा ही विनंती.


मा.मुरलीधर मोहोळ


आचार्य संगीत कृष्ण सांवरिया बाबा


मा.सौ.मंजुषाताई दीपक नागपुरे


मा.सौ.शीतल तेली-उगले

दररोज बाप्पांची आरतीः
वेबसाईट
YouTube
facebook
Instagram



प्रेम मंदिर, वृंदावन

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे ■ सुवर्णयुग तरुण मंडळ, पुणे
गणपती भवन, २५०, बुधवार पेठ, पुणे २, फोनः २४४७९२२२ ■ गणपती सदन, १३२, बुधवार पेठ, शैक्षणिक संकुल, पुणे २, फोनः २४४९२०००
E-mail: contact.dhgt@gmail.com
jayganesh.dhgt@gmail.com
बाप्पांचे ॲप डाऊनलोड कराः २४ तास बाप्पांचे थेट दर्शन

## थोडक्यात पण महत्वाचे



### भव्य पुष्परथातून मंडईच्या शारदा गजाननाची आगमन मिरवणूक

**पुणे : दैनिक संध्या**

अखिल मंडई मंडळाच्या शारदा गजाननाची सोमवारी (दि. १४) सकाळी १० वाजता फुलांनी सजविलेल्या भव्य पुष्परथातून आगमन मिरवणूक काढण्यात येणार आहे. मिरवणुकीनंतर दुपारी १२ वाजता डॉ. विनय थोरात आणि प्रतिभा थोरात यांच्या हस्ते हरिहर मंदिरात श्रींची प्राणप्रतिष्ठापना होणार आहे. मिरवणुकीत समर्थ आणि तालचक्र ढोलपथकांसह न्यू गंधर्व बँड सहभागी होणार आहेत, अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष अण्णा थोरात यांनी दिली. अखिल मंडई मंडळाच्या गणेशोत्सवाचे यंदा १३३ वे वर्ष आहे. अखिल मंडई मंडळ – मंडई पोलीस चौकी, रामेश्वर चौक, गोटीराम भैया चौक, मेट्रो स्टेशन मार्गे उत्सव मंडप असा मिरवणुकीचा मार्ग असणार आहे. मिरवणुकीच्या अग्रभागी न्यू गंधर्व बॅन्ड पथक आणि वाद्यपथके असणार आहेत. भगवान विष्णू आणि भगवान शिव यांच्या एकात्म स्वरूपाचे प्रतीक असलेल्या हरिहर संकल्पनेवर आधारित भव्य मंदिराची उभारणी मंडळाकडून करण्यात आली आहे. शेषशायी विष्णूची मूर्ती, शिवपिंड तसेच शिव-विष्णूच्या समन्वयाचे दर्शन मंदिरातून होणार आहे. भव्य हरिहर मंदिरात विराजमान होणार शारदा गजानन — तब्बल ९० बाय ६० फूट आकाराच्या मंडपात २५ फूट उंचीचे हे मंदिर पूर्णपणे फायबरमध्ये साकारण्यात आले आहे. मंदिराची कलात्मक संकल्पना आणि निर्मिती कलादिग्दर्शक विशाल ताजनेकर आणि गजेंद्र पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. अण्णा थोरात म्हणाले, हरिहर मंदिराची संकल्पना भगवान शिव आणि भगवान विष्णू यांच्या एकात्मतेचा संदेश देणारी आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून भक्तांमध्ये ऐक्याची भावना निर्माण व्हावी, हा या देखाव्यामागील उद्देश आहे.

### स्मार्ट शहर नियोजनात जंगले, शेतजमीन आणि पाणथळ जागांचे संरक्षण करणे गरजेचे

**पुणे : दैनिक संध्या**

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी (MIT-WPU), पुणे येथे 'हफीझ कॉन्ट्रॅक्टर स्कूल ऑफ आर्किटेक्चर'च्या भव्य उद्घाटन परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले पद्मभूषण विजेते प्रसिद्ध वास्तुविशारद हफीझ कॉन्ट्रॅक्टर यांनी शहरांच्या नियोजनात नवीन दृष्टिकोन स्वीकारण्याचे आवाहन केले. वाढत्या नागरी लोकसंख्येला सामावून घेण्यासाठी शेतजमीन, जंगले आणि पाणथळ जागांचे संरक्षण करत त्रिमितीय आणि उच्च-घनतेच्या बांधकाम पद्धतींचा विचार करणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. या कार्यक्रमास सन्माननीय पाहुणे म्हणून फाईन ज्वेलर्स पवन आनंद आणि वास्तुविशारद पुष्कर कानविंदे उपस्थित होते. तसेच एमआयटी-डब्ल्यूपीयूचे नेतृत्व, प्राध्यापक, विद्यार्थी आणि वास्तुकला, डिझाइन व उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते. बदलती शहरे, पर्यावरणासमोरील आव्हाने आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर वास्तुकला शिक्षणात कसे बदल झाले पाहिजेत, यावर परिषदेत सखोल चर्चा झाली. आपल्या भाषणात बोलताना हफीझ कॉन्ट्रॅक्टर म्हणाले की, माझे नाव असलेल्या वास्तुशास्त्र महाविद्यालयाशी जोडले जाणे ही एक मोठी जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांनी वास्तुकलेची मूलभूत तत्त्वे शिकली पाहिजेत आणि आपण जे काही करतो त्यामागे एक स्पष्ट उद्देश असला पाहिजे. शहरांची झपाट्याने होणारी वाढ पाहता आपल्याला बांधकामाच्या आणि शहर नियोजनाच्या पारंपरिक पद्धतींचा पुनर्विचार करावा लागेल. ते पुढे म्हणाले की, शहरांचा विस्तार करताना शेतजमीन आणि जंगले नष्ट करणे यापुढे चालणार नाही. जर आपण आपला पर्यावरण-समतोल बिघडवला, तर आपले अस्तित्व धोक्यात येईल. शहरांमध्ये येणाऱ्या लाखो लोकांच्या गरजा आणि खर्च लक्षात घेऊन अधिक उंच इमारती उभारण्याच्या नव्या पर्यायांचा शोध घेतला पाहिजे. आपले शहर नियोजन हे केवळ द्विमितीय न राहता त्रिमितीय असायला हवे. तसेच भूकंप आणि चक्रीवादळांसारख्या नैसर्गिक आपत्तींचा विचार करून इमारतींचे डिझाइन केले पाहिजे. सिमेंट आणि स्टील हे मूलभूत साहित्य असले तरी ते अधिक मजबूत बनवण्यासाठी त्यात सुधारणा करणे गरजेचे आहे. भविष्यातील शहरांची रचना ही आपले भविष्य घडवणारी ठरेल आणि या संस्थेने नवीन संकल्पना निर्मितीवर भर दिला पाहिजे, कारण भविष्य तरुणांचेच आहे.

### लघु व मध्यम उद्योगांना 'इंडस्ट्रीयल क्लिनिक'ची मात्रा

**पुणे: दैनिक संध्या**

भारतामध्ये तरुणांची संख्या खूप मोठी असून, पुढील २० वर्ष ही संख्या तशीच राहणार आहे. भारतात मॅन्यूफॅक्चरींग जीडीपी सर्वात कमी आहे, त्यामुळे येत्या काळात लघु व मध्यम उद्योगांमध्ये नोकरीच्या मोठ्या संधी आहेत. या उद्योगांना अनेक अडचणीचा सामना करावा लागतो. या अडचणी सोडवून उद्योगांचे स्वास्थ्य अधिक चांगले होण्यासाठी 'इंडस्ट्रीयल क्लिनिक' तज्ज्ञ व्यक्तींच्या माध्यमातून मार्गदर्शन करणार आहे, अशी माहिती हिंदुस्थान अँटिबायोटिक्स लिमिटेडचे माजी व्यवस्थापकीय संचालक यशवंत घारपुरे यांनी दिली. यशवंत घारपुरे यांच्या अध्यक्षतेखाली 'इंडस्ट्रीयल क्लिनिक'ची बैठक नुकतीच पार पडली. भांडारकर रस्त्यावरील हॉटेल रविराज येथे झालेल्या या बैठकीला पुणे मॅनेजमेंट असोसिएशनचे अध्यक्ष बाळ पाटील, कंपनी सेक्रेटरी विनायक खानवलकर, गृहनिर्माण सोसायटीचे अभ्यासक सुहास पटवर्धन यांच्यासह उद्योग क्षेत्रात विविध पदांवर काम करणाऱ्या आणि कंपनीतील वरिष्ठ पदावरुन निवृत्त झालेल्या मान्यवरांनी उपस्थिती लावली होती. या उपक्रमाबद्दल माहिती देताना यशवंत घारपुरे म्हणाले, "ही संकल्पना पूर्णपणे नवीन असून ती लघु व मध्यम उद्योगांसाठी फायदेशीर होईल. या संकल्पनेअंतर्गत मनुष्यबळ, यंत्रसामग्री, कच्चा माल, विपणन, आर्थिक बाबी आणि कार्यपद्धती या सहा क्षेत्रांतील तज्ज्ञ समस्यांचे निदान करून त्यावर योग्य उपाययोजना सुचवतील. यासाठी लघु व मध्यम उद्योगांना भेडसावू शकणाऱ्या संभाव्य समस्यांची यादी तयार केली आहे. संबंधित उद्योगाने त्यांना भेडसावणाऱ्या समस्यांबाबत सांगायचे. त्यानंतर वरील सहा क्षेत्रातील तज्ज्ञ संबंधित उद्योगाला मार्गदर्शन करतील. यासाठी विविध उद्योगातील तज्ज्ञांनी मार्गदर्शनाची तयारी दर्शवली असून, त्यांची एक टीम स्थापन करण्यात येणार आहे." बाळ पाटील म्हणाले, "कोणत्याही उद्योगाच्या यश आणि अपयशासाठी परिस्थिती किंवा इतर कोणत्याही गोष्टी जबाबदार नसतात, तर उद्योगपती स्वत: जबाबदार असतो.



# कै. डॉ. टी. आर. इंगळे यांच्या स्मरणार्थ राष्ट्रीय संशोधन उपक्रम

■ पुणे (दै. संध्या)

सर परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभाग आणि इंगळे परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने कै. डॉ. टी. आर. इंगळे यांच्या स्मरणार्थ आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय संशोधनपर व्याख्यान व पोस्टर सादरीकरण स्पर्धेला लेडी रमाबाई हॉल येथे प्रारंभ झाला आहे. महाराष्ट्रासह आठ राज्यांतील विविध विद्यापीठातून विद्यार्थ्यांचा सहभाग लाभलेल्या या उपक्रमात ३९ विद्यार्थ्यांनी व्याख्यानासाठी, तर ६४ विद्यार्थ्यांनी पोस्टर सादरीकरणासाठी सहभाग नोंदविला. "केमिस्ट्री:शेपिंग बेटर टुमारो" हे यंदाच्या उपक्रमाची मुख्य संकल्पना आहे.

महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष तुषार कुलकर्णी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील, विज्ञान शाखा उपप्राचार्या डॉ. सुनीता जाधव व रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. वंदना आरबाळे-तोरणे यांच्यासह कै. डॉ. टी. आर. इंगळे यांचे आप्तेष्ट, स्नेही व नातेवाईक उपस्थित होते. त्यांचे कनिष्ठ सुपुत्र मुकुंद इंगळे आणि त्यांच्या पत्नी वर्षा इंगळे यांची विशेष उपस्थिती होती.

प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील म्हणाले, कै. डॉ. टी. आर. इंगळे हे महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आणि याच महाविद्यालयातील प्राध्यापक होते. सुमारे तीन दशकांपूर्वी सुरू झालेला हा संशोधनपर उपक्रम आजही सातत्याने सुरू आहे, ही कौतुकास्पद बाब आहे. महाराष्ट्रातील आठ राज्यांमधून विद्यार्थ्यांनी सहभाग घेतल्याने ही स्पर्धा खऱ्या अर्थाने राष्ट्रीय झाली आहे. विद्यार्थ्यांना अशा प्रकारच्या पाठबळाची आज पूर्वीपेक्षा अधिक गरज आहे. शिक्षणातून विद्यार्थ्यांना मनापासून आधार आणि अशा संधी देता आल्या, तर त्यांच्या विकासाला चालना मिळेल. विद्यार्थ्यांना विकसित होण्यासाठी अशा संधी निर्माण करणे हीच खरी राष्ट्रसेवा आहे.

कै. डॉ. टी. आर. इंगळे यांचे कनिष्ठ सुपुत्र मुकुंद इंगळे यांनी संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी दोन पुरस्कारांची घोषणा केली. रसायनशास्त्र क्षेत्रात उत्कृष्ट व उल्लेखनीय संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञ किंवा प्राध्यापकाचा दरवर्षी गौरव करण्यासाठी कै. डॉ. टी. आर. इंगळे मेमोरियल केमिस्ट्री रिसर्च एक्सलन्स अवॉर्ड, तर स. प. महाविद्यालयाच्या संशोधन केंद्रातील पीएच.डी. विद्यार्थ्यांमधून उत्कृष्ट संशोधन करणाऱ्या एका संशोधकाला कै. डॉ. टी. आर. इंगळे मेमोरियल रिसर्च स्कॉलर अवॉर्ड २०२७ पासून देण्यात येणार आहे. यापैकी प्रथम पुरस्काराची रक्कम पंचवीस हजार रुपये असल्याचेही त्यांनी जाहीर केले.

मुकुंद इंगळे म्हणाले, कै. डॉ. टी. आर. इंगळे यांना शिकवण्यापेक्षा शिकण्यात अधिक आनंद मिळत होता. त्याच भावनेतून या प्रयोगशाळेची निर्मिती झाली. त्यांचे स्मरण केवळ नाव देण्यापुरते मर्यादित न राहता, तरुणांना शिकण्यासाठी, प्रश्न विचारण्यासाठी, प्रयोग करण्यासाठी आणि नवे शोध घेण्यासाठी प्रोत्साहित करण्यातून व्हावे. चांगल्या वैज्ञानिकाला आपल्या संशोधनाचे महत्त्व स्पष्ट करता आले पाहिजे. या ३० वर्षांच्या प्रवासाच्या स्मरणार्थ यावर्षीपासून संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी पंचवीस हजार रुपयांचा प्रथम पुरस्कार सुरू करण्यात येत आहे.

तुषार कुलकर्णी म्हणाले, अनेकांचे या उपक्रमात योगदान आहे. इंगळे सर पूर्वी आपल्याकडे होते; मात्र त्यांच्या कुटुंबीयांनी साता समुद्रापार राहूनसुद्धा महाविद्यालयाशी असलेली नाळ कायम जपली आहे. असे उदाहरण खूप कमी ठिकाणी पाहायला मिळते. एस. पी. कॉलेज आणि शिक्षण प्रसारक मंडळी हे समाजासाठी काहीही करण्याचे सर्वोत्तम व्यासपीठ आहे. शिक्षण क्षेत्रासाठी तुम्ही जे काही योगदान द्याल, त्याचा तुम्हाला अभिमान वाटेल, याची मी ग्वाही देतो.

रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. वंदना आरबाळे-तोरणे यांनी विभागातील विविध शैक्षणिक व संशोधनपर उपक्रमांची माहिती दिली. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन, प्रयोगशीलता आणि संशोधन सादरीकरणाचे कौशल्य विकसित होत असल्याचे त्यांनी सांगितले.

कै. डॉ. टी. आर. इंगळे यांच्या जीवनकार्याचा, संशोधनातील योगदानाचा आणि स. प. महाविद्यालयाशी असलेल्या त्यांच्या ऋणानुबंधांचा परिचय करून देणारा जीवनपटाचा व्हिडिओ यावेळी दाखविण्यात आला. कै. डॉ. इंगळे हे स. प. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी तसेच प्राध्यापक होते. त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधनपर योगदान दिले असून राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (एनसीएल), पुणे आणि अमेरिका येथे प्राध्यापक व शास्त्रज्ञ म्हणून कार्य केले.

या उपक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील, विज्ञान शाखेच्या उपप्राचार्या डॉ. सुनीता जाधव, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. वंदना आरबाळे-तोरणे तसेच समन्वयक डॉ. दिनेश गरुड व डॉ. प्रणव चंद्रचूड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

## गणेशोत्सवात पारंपरिक वाद्य आणि खेळांची प्रात्यक्षिके पथकांनी समाविष्ट करावी



■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागात मोठ्या उत्साहात गणेशोत्सव साजरा होणार असून त्यामध्ये राज्याच्या विविध भागातील ढोल ताशा पथकांचा मोठा सहभाग असणार आहे. त्यामुळे यंदा ढोल ताशांसोबतच आगमन मिरवणुकांमध्ये पारंपरिक वाद्य आणि तालांचे व खेळांचे सादरीकरण करण्याचे आवाहन ढोल ताशा फेडरेशन राज्यव्यापी महासंघ महाराष्ट्र च्या कार्यकारिणीची बैठकीत करण्यात आले.

बैठकीत अध्यक्ष पराग ठाकूर, सचिव संजय सातपुते, खजिनदार ॲड. शिरीष थिटे, सदस्य विलास शिगवण, आशुतोष देशपांडे हे पुण्यातून तर अनिरुद्ध देशपांडे (नागपूर) ,अतुल दौंडकर ( पिंपरी चिंचवड) सुभाष लाडे ( मुंबई) सिद्धू जित्ता ( सोलापूर) हे महासंघ पदाधिकारी उपस्थित होते. तसेच पुणे शहर अध्यक्ष अक्षय बलकवडे, पिंपरी चिंचवड अध्यक्ष विशाल मानकर, सोलापूर जिल्हा अध्यक्ष प्रशांत कुडक्याल यांची देखील उपस्थिती होती. पराग ठाकूर म्हणाले, गणेशोत्सव आगमन मिरवणुकांमध्ये आणि सोसायटयांमधून होणाऱ्या कार्यक्रमामध्ये पारंपरिक वाद्य आणि खेळांची प्रात्यक्षिके यांचा समावेश करण्यात यावा. तसेच ढोल वाद्यांचे पारंपरिक पाच हातांचे सादरीकरण व्हावे. तसेच लेझिम, ध्वज, ढाल तलवार, टिपरी, साहसी खेळांची प्रात्यक्षिक सादरीकरण अनेक पथकांमध्ये करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील सर्व पथकांना देखील असा सहभाग घ्यावा. रक्तदान शिबिर, स्वच्छता अभियान, गुणवान वादकांचा गौरव, आरोग्य शिबिर हे उपक्रम राबवण्यात यावे, असे आवाहनही करण्यात आले आहे. सातारा, सांगली, कोल्हापूर, मुंबई , नाशिक, नागपूर , अहिल्यानगर, छत्रपती संभाजी नगर येथील पथकांना संपर्क करून याबाबत सहभागी होण्यासाठी आवाहन करण्यात येणार आहे. ढोल ताशा पथकांच्या अडचणी सोडवणे, या ऐतिहासिक कलेचा प्रचार प्रसार करणे, विविध समाजोपयोगी उपक्रम राबवणे यासाठी महासंघाच्या माध्यमातून विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.

## किशोर आवारे खून खटल्यात साक्षीदारांवरील दबावाचे आरोप

■ पुणे (दै. संध्या)

तळेगाव दाभाडे येथील जनसेवा विकास समितीचे अध्यक्ष किशोर आवारे यांच्या खून खटल्यात साक्षीदारांवर दबाव आणला जात असल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. पिंपरी येथे आयोजित पत्रकार परिषदेत साक्षीदारांनी गोळीबाराची धमकी, साक्ष बदलण्यासाठी दबाव, मध्यरात्री घरी गाठून धमकावणे तसेच पोलिस संरक्षण काढून घेतल्याचे आरोप केले. यावेळी किशोर आवारे यांच्या हत्येसाठी २० लाख रुपयांचा व्यवहार झाल्याचा दावाही करण्यात आला.

किशोर आवारे यांची १२ मे २०२३ रोजी तळेगाव नगरपरिषदेसमोर गोळ्या झाडून हत्या झाली होती. या प्रकरणाचा सत्र खटला क्रमांक ५४/२०२३ वडगाव मावळ येथील अतिरिक्त सत्र न्यायालयात सुरू आहे. तपासादरम्यान गोळा करण्यात आलेले इलेक्ट्रॉनिक पुरावे आणि प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब खटल्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व महत्त्वाच्या साक्षीदारांना सातत्याने पोलिस संरक्षण देण्याची मागणी पत्रकार परिषदेत करण्यात आली. प्रकरणातील साक्षीदार मोहसीन मुलाणी यांनी किशोर आवारे यांच्या हत्येपूर्वी कटाची माहिती मिळाल्याचा तसेच त्याबाबत आवारे यांना सावध केल्याचा दावा केला आहे. पत्रकार परिषदेत करण्यात आलेल्या आरोपानुसार, सुधाकर शेळके यांनी आपल्या समोर किशोर आवारे यांना मारण्यासाठी २० लाख रुपये दिल्याचा दावा मोहसीन मुलाणी यांनी केला. त्यानंतर आपला जबाब बदलण्यासाठी आपल्यावर दबाव आणण्यात आल्याचेही त्यांनी सांगितल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद आहे. आकाश जगताप हे या प्रकरणातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असून, घटनेच्या वेळी त्यांनी मोबाईलमध्ये व्हिडिओ रेकॉर्डिंग केल्याचा दावा करण्यात आला आहे. पत्रकार परिषदेत करण्यात आलेल्या आरोपानुसार, संदीप गराडे यांनी आकाश जगताप यांना बोलावून त्यांच्या डोक्याला बंदूक लावली आणि साक्ष देऊ नये, अशी धमकी दिली. उलटतपासणीदरम्यान आपल्यावर साक्ष देऊ नये म्हणून दबाव आणण्यात आला तसेच बंदुकीचा धाक दाखविण्यात आल्याचे त्यांनी न्यायालयात सांगितल्याचा उल्लेख प्रसिद्धीपत्रकात आहे. अनिल पवार यांनी आपले पोलिस संरक्षण काढून घेण्यात आल्याचा आरोप केला.

# कसबा गणपती मंदिरात मोरया गोसावी पालखी सोहळ्याचे स्वागत

■ पुणे (दै. संध्या)

ग्रामदैवत श्री कसबा गणपती मंदिरात आगमन झाल्यानंतर श्रीमन्महासाधू मोरया गोसावी पालखी सोहळ्याचे उत्साहात स्वागत करण्यात आले. चिंचवड मधून श्री मोरया गोसावी पालखीचे प्रस्थान झाल्यानंतर पालखी सोहळा पुण्याचे ग्रामदैवत श्री कसबा गणपती मंदिरात श्री जयति गजाननाच्या दर्शनासाठी थांबण्याची गेल्या शेकडो वर्षांची परंपरा आहे.



प्रथेनुसार ग्रामदैवत श्री कसबा गणपती मंदिराचे सांप्रत ठकार, महिला वहिवाटदार, पुजारी पालखीचे औक्षण करतात. शेकडो वर्षांची ही परंपर आजही अव्याहतपणे चालू आहे. यावेळी मंदिराचे प्रमुख विश्वस्त विनायक बाजीराव ठकार, विश्वस्त स्वानंद ठकार, आशापूरक ठकार, मंदिराच्या विश्वस्त संगीता ठकार, मधुरा ठकार, सीमा ठकार, सुधा ठकार, गायत्री ठकार उपस्थित होत्या. चिंचवड देवस्थानचे प्रमुख विश्वस्त मंदार महाराज देव यांनी ग्रामदैवत श्री कसबा गणपती चे दर्शन घेतल्यानंतर आशापूरक ठकार यांनी मंदार महाराज देव यांचे स्वागत केले. तसेच सीमा ठकर यांनी त्यांचे औक्षण केले. दरवर्षी माघ आणि भाद्रपद महिन्यच्या शुद्ध प्रतिपदा ते शुद्ध चतुर्थी दरम्यान श्रीमन्महासाधू मोरया गोसावी यांची चिंचवड ते मोरगाव अशी पायी पालखी यात्रा संपन्न होते.

भाद्रपद शुद्ध प्रतिपदेला या पालखी सोहळ्याने चिंचवड येथून मोरगावकडे प्रस्थान केले. यानंतर पालखी सोहळा मुक्कामी मार्गस्थ झाला. चिंचवड देवस्थान आयोजित या पालखी यात्रेतील ग्रामदैवत श्री कसबा गणपती दर्शन हा एक अतिशय महत्त्वाचा टप्पा आहे. श्री कसबा गणपती मंदिरात भाद्रपद गणेश जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. उत्सवात भजनसंध्या, तबला-व्हायोलिन जुगलबंदी, अथर्वशीर्ष पठण, अभिषेक, भक्तिगीते, ढोल-ताशा वादन तसेच गणेशजन्म आरती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी विविध कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

सोमवारी, १४ सप्टेंबर रोजी गणेश चतुर्थीनिमित्त सकाळी श्रींची महापूजा, चौघडा वादन आणि अभिषेक होणार आहे. दुपारी १२.३० ते २ या वेळेत 'श्री' गणेशजन्म आरती सोहळा होणार असून रात्री शेजारती आणि छबिन्याचे आयोजन करण्यात आले आहे. ऋषिपंचमीनिमित्त मंगळवारी, १५ सप्टेंबर रोजी सकाळी चौघडा वादन व अभिषेक, तर रात्री शेजारती आणि प्रसाद भजन होणार आहे.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे




### 'जंगल टेल्स विथ मोगली' 12 सप्टेंबरपासून जिओहॉटस्टार आणि डिस्ने चॅनेलवर

**पुणे : दैनिक संध्या**

जिओस्टारच्या किड्स अँड फॅमिली पोर्टफोलिओने आपल्या नव्या शीर्षक 'जंगल टेल्स विथ मोगली'द्वारे सर्वांच्या लाडक्या मोगलीला नव्या रूपात प्रेक्षकांसमोर आणले आहे. प्रसिद्ध कथेवर आधारित ही मालिका स्लॅपस्टिक कॉमेडीने भरलेली असून, मजा आणि जुन्या आठवणींचा सुंदर मिलाफ घडवते. 12 सप्टेंबर 2026 रोजी दुपारी 2 वाजता ही मालिका जिओहॉटस्टार आणि डिस्ने चॅनेलवर प्रीमियर होणार आहे. 10 वर्षांचा जिज्ञासू आणि खट्याळ मोगली हा या मालिकेचा केंद्रबिंदू आहे. जंगलातील त्याच्या आगळ्यावेगळ्या साहसांमध्ये तो अनेकदा अडचणीत सापडतो आणि त्यातून विनोदी प्रसंग घडतात. परिस्थितीजन्य विनोद, स्लॅपस्टिक कॉमेडी आणि मिश्कील संवादांनी सजलेली ही मालिका बालू आणि बघीरा यांसारख्या मोगलीच्या मित्रांना, तसेच शेरखान, का आणि तबाकी यांसारख्या त्याच्या प्रतिस्पर्ध्यांनाही पुन्हा भेटण्याची संधी देईल. हे पात्र पालकांच्या बालपणीच्या आठवणी ताज्या करतील, तर मुलांना प्रथमच या अविस्मरणीय पात्रांची ओळख करून देतील. जिओस्टारचे हिंदी आणि इंग्रजी मनोरंजन व्यवसाय (स्ट्रीमिंग, टीव्ही आणि स्टुडिओ) प्रमुख आलोक जैन म्हणाले, "काही पात्रे अशी असतात जी कायम काळाच्या पलीकडे जातात आणि प्रत्येक पिढीशी जोडली जातात. मोगली हे त्यापैकीच एक आहे. 'जंगल टेल्स विथ मोगली'द्वारे आम्ही 'द जंगल बुक'च्या कालातीत विश्वाला आजच्या मुलांच्या आणि कुटुंबांच्या आवडीनुसार नव्या ऊर्जा, विनोद आणि संवेदनशीलतेसह सादर करण्याचा प्रयत्न केला आहे. ही कथा देशभरातील मुलांना आणि कुटुंबांना एकत्र आणण्याची आणि त्यांचे मनोरंजन करण्याची क्षमता बाळगते, असा आम्हाला विश्वास आहे." 'जंगल टेल्स विथ मोगली'च्या प्रचारासाठी मोठ्या प्रमाणावर मल्टी-स्क्रीन मोहीम राबवली जाणार आहे. जिओस्टार नेटवर्क आणि जिओहॉटस्टारद्वारे ही मालिका देशभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचेल. या मोहिमेची सुरुवात ॲनिमे इंडियामध्ये विशेष उपस्थितीने झाली असून, त्यामुळे जुन्या चाहत्यांच्या बालपणीच्या आठवणी पुन्हा जाग्या झाल्या आहेत. पुढील टप्प्यात ही मोहीम प्रमुख मॉल्स आणि कुटुंबकेंद्रित ठिकाणी पोहोचेल. डिजिटल माध्यमांवर विविध वयोगटातील क्रिएटर्सच्या सहकार्याने मोगलीच्या कथा नव्या पिढीपर्यंत पोहोचवल्या जातील आणि जुन्या आठवणींना उजाळा दिला जाईल. या लॉन्चमुळे मल्टी-स्क्रीन प्रेक्षकांसाठी मजबूत किड्स अँड फॅमिली एंटरटेनमेंट इकोसिस्टम उभारण्याच्या जिओस्टारच्या ध्येयाला आणखी बळ मिळाले आहे. मोटू पतलू, चिकू और बंटी, बिट्टू बहानेबाज यांसारख्या लोकप्रिय स्वदेशी आयपींच्या यशानंतर 'जंगल टेल्स विथ मोगली' हा नेटवर्कचा 16वा स्वदेशी आयपी ठरला आहे. या मालिकेच्या लॉन्चला अधिक आकर्षक बनवण्यासाठी निव्हिया आणि टेडीबार हे को-पॉवर्ड बाय स्पॉन्सर्स म्हणून सहभागी झाले आहेत.

### महामार्गाबाहेरील उपकरणांसाठी प्रगत उपाय सादर करणार एनबीसी बेअरिंग्स

**पुणे : दैनिक संध्या**

नॅशनल इंजिनिअरिंग इंडस्ट्रीज लिमिटेड (एनईआय) चा प्रमुख बेअरिंग ब्रँड एनबीसी बेअरिंग्स बॉमा कॉनएक्सपो इंडिया २०२६ मध्ये सहभागी होणार आहे. हे प्रदर्शन १५ ते १८ सप्टेंबर २०२६ दरम्यान इंडिया एक्स्पो सेंटर, ग्रेटर नोएडा येथे आयोजित केले जाणार आहे. यावेळी कंपनी बांधकाम आणि महामार्गाबाहेरील उपकरणांसाठी आपल्या वाढत्या उत्पादन श्रेणीचे प्रदर्शन करणार असून, टिकाऊपणा, कार्यक्षमता आणि विविध गरजांनुसार विकसित केलेल्या अभियांत्रिकी उपायांवर विशेष भर दिला जाणार आहे. नॅशनल इंजिनिअरिंग इंडस्ट्रीज लिमिटेडचे मुख्य विक्री आणि विपणन अधिकारी राजेश प्रेमचंद्रन म्हणाले, "बांधकाम आणि महामार्गाबाहेरील उपकरणे अत्यंत कठीण परिस्थितीत काम करतात. अशा वेळी उपकरणांमधील भागांची विश्वासार्हता यंत्र किती काळ कार्यरत राहते आणि त्याची उत्पादकता यावर थेट परिणाम करते. एनबीसी बेअरिंग्समध्ये आम्ही उद्योग क्षेत्रासोबत जवळून काम करून त्यांच्या आव्हानांना समजून घेतो आणि प्रत्यक्ष कामकाजाच्या परिस्थितीनुसार योग्य उपाय विकसित करतो. बॉमा कॉनएक्सपो इंडिया आम्हाला आमच्या अभियांत्रिकी क्षमतांचे प्रदर्शन करण्यासाठी तसेच उपकरण उत्पादकांच्या बदलत्या तांत्रिक गरजा समजून घेण्यासाठी आणि त्यावर चर्चा करण्यासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध करून देते." बांधकाम क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या उपकरणांना जड भार, धक्के, कंपन, धूळ, दूषित वातावरण आणि दीर्घकाळ सतत काम करणे अशा कठीण परिस्थितींचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत उपकरण उत्पादक उत्पादकता वाढवणे, यंत्रे अधिक काळ कार्यरत ठेवणे आणि त्यांची कार्यक्षमता सुधारणे यावर अधिक भर देत आहेत. त्यामुळे बेअरिंगसारख्या महत्त्वाच्या भागांची गुणवत्ता आणि कामगिरी अधिक महत्त्वाची ठरत आहे. बॉमा कॉनएक्सपो इंडिया २०२६ मध्ये एनबीसी बेअरिंग्स आपल्या अभियांत्रिकी क्षमता आणि विविध उपकरणांशी संबंधित तांत्रिक ज्ञानाच्या मदतीने या आव्हानांवर कशा प्रकारे मात करता येते, हे दाखवणार आहे. जास्त भार सहन करण्याची क्षमता, टिकाऊपणा आणि सातत्यपूर्ण कामगिरी आवश्यक असलेल्या उपकरणांसाठी विकसित केलेले उपाय कंपनी येथे सादर करेल. कंपनी या प्रदर्शनात बांधकाम उपकरण क्षेत्रासाठी नवीन बेअरिंग उपाय देखील सादर करणार आहे. यामुळे या क्षेत्रासाठी कंपनीची उत्पादन श्रेणी आणखी मजबूत होईल. प्रदर्शनादरम्यान सादर करण्यात येणारी ही नवीन उत्पादने उपकरणांच्या बदलत्या रचना आणि कामकाजाच्या परिस्थिती लक्षात घेऊन विकसित करण्यात आली आहेत.

### सिंबायोसिस येथे 'माहेरवाशीण' उपक्रमाचा उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

**पुणे : दैनिक संध्या**



सुरक्षित मातृत्व ही केवळ आरोग्य व्यवस्थेची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. मातृत्वाचा प्रवास प्रत्येक महिलेने भीतीतून नव्हे, तर विश्वासातून करावा. वैद्यकीय उपचारांसोबत माया, आधार, सुरक्षितता आणि सन्मानाची जोड देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले. सिंबायोसिस विद्यापीठ रुग्णालय व संशोधन केंद्राच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या 'माहेरवाशीण – मातृत्व सेवेची नवी संकल्पना' या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ आज सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ कॅम्पस, लवळे, मुळशी येथे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते झाला. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी आमदार शंकर मांडेकर, सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठाच्या कुलपती डॉ. विद्या येरवडेकर, कुलगुरू डॉ. आर. रमण, प्रोव्होस्ट तथा वैद्यकीय व आरोग्य विज्ञान विद्याशाखेचे प्रमुख डॉ. राजीव येरवडेकर, सिंबायोसिसचे संस्थापक व अध्यक्ष प्रा. (डॉ.) शां. ब. मुजुमदार आदी उपस्थित होते.




# फिट इंडिया, प्रदूषणमुक्त पुण्यासाठी पाच हजार पुणेकरांचा सहभाग

## आरोग्यपूर्ण जीवनशैली, प्रदूषणमुक्त पुण्यासाठी पाच हजार पुणेकर रस्त्यावर

**■ पुणे (दै. संध्या)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून रमाबाई आंबेडकर महिला सबलीकरण केंद्राच्या वतीने 'पुणे ऑन पेडल्स' सायकल रॅली, तसेच 'पुणे फॅमिली वॉकेथॉन'चे आयोजन करण्यात आले. पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार व प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते ध्वज दाखवून रॅलीला सुरुवात झाली. ही रॅली मयूर कॉलनीतील बालशिक्षण मंदिर येथून निघून कर्वे रोड मार्गे डेक्कन जिमखाना, छत्रपती संभाजी महाराज पुतळा ते पुन्हा बालशिक्षण मंदिर अशी समाप्त झाली.

या रॅलीच्या निमित्ताने १५० गरीब गरजू विद्यार्थ्यांना सायकलींचे मोफत वाटप करण्यात आले. रॅलीत सहभागी प्रत्येकाला पदक, प्रमाणपत्र आणि टी-शर्ट देऊन गौरविण्यात आले. सुमारे पाच हजार पुणेकर या सायकल रॅली व वॉकेथॉनमध्ये सहभागी झाले होते. प्रसंगी माजी नगरसेवक जयंत भावे, विश्राम कुलकर्णी आदी उपस्थित होते.

गिर्यारोहक गणेश आगाशे, खोखो प्रशिक्षक पुष्कर बर्वे, खोखो पुरस्कार विजेती राखी बर्वे, आयर्नमन स्पर्धा विजेते कुणाल आणि मीनल काशीकर, निवृत्त पोलीस अधिकारी विष्णु ताम्हाणे, क्लायंबर रुद्र करंदीकर व किया रेवणकर, क्रीडा छायाचित्रकार नितीन खानोलकर, अल्ट्रा सायकलिंग स्पर्धेतील विजेते प्रशांत व मेधा जोग यांना यावेळी सन्मानित करण्यात आले. अमितेश कुमार म्हणाले, "विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी देशातील प्रत्येक नागरिकाने योगदान देणे आवश्यक आहे. 'फिट इंडिया'च्या माध्यमातून नागरिकांनी आरोग्य आणि तंदुरुस्तीला प्राधान्य द्यावे, तसेच पर्यावरण संवर्धनासाठीही सक्रिय सहभाग नोंदवावा. देशाच्या विकासासाठी पायाभूत सुविधा उभारणीवर भर देतानाच, येत्या काळात सायकल प्लॅनच्या माध्यमातून सायकल संस्कृतीला प्रोत्साहन देण्याची गरज आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून सामान्य नागरिक, महिला सुरक्षेसाठी कटिबद्ध आहोत."प्रास्ताविकात प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, आदरणीय मोदीजींच्या वाढदिवसाच्या निमित्ताने



आयोजित 'पुणे ऑन पेडल' सायकल रॅलीचे यंदाचे सातवे वर्ष आहे. आरोग्यपूर्ण जीवनासाठी, प्रदूषणमुक्त पुण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण आहे. देशाच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय घेऊन मोदीजी काम करीत आहेत. त्यांच्या या उदात्त कार्याला कृतज्ञता म्हणून हा उपक्रम राबविण्यात येतो आहे."

जयंत भावे यांनी सूत्रसंचालन केले. निलेश मिसाळ, जान्हवी जोशी, यामिनी मठकरी, निनाद पटवर्धन, गिरीश डोंगरे, कल्याणी टोकेकर, अमित पागे, शैलेश संचेती, प्रकाश तापकीर, अमेय कोकाटे, लोकेश राणे, दिनेश मुंडे, दिपाली मोहिते, तेजस गुप्ता या सर्वांनी कार्यक्रमासाठी मेहनत घेतली.

## ग्रेटर नोएडा येथे होणार बाउमा कॉनएक्सपो इंडिया 2026 चे आयोजन



**■ पुणे (दै. संध्या)**

कन्स्ट्रक्शन मशिनरी, बिल्डिंग मटेरियल मशिन्स, मायनिंग मशिन्स आणि कन्स्ट्रक्शन वाहनांसाठी भारतातील 2026 मधील सर्वात मोठ्या ट्रेड फेअर्सपैकी एक असलेल्या बाउमा कॉनएक्सपो इंडिया 2026 चे आयोजन 15 ते 18 सप्टेंबरदरम्यान इंडिया एक्स्पो सेंटर, ग्रेटर नोएडा येथे केले जाणार आहे. पूर्णपणे बुक झालेल्या या आठव्या आवृत्तीत 14.5 लाख चौरस फूट क्षेत्रात 1,100 हून अधिक प्रदर्शक सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाला 100 हून अधिक देशांमधून 75,000 पेक्षा जास्त व्हिजिटर्स येण्याची अपेक्षा आहे. बिहार सरकार स्टेट पार्टनर म्हणून सहभागी होणार आहे, तर 15 हून अधिक राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधून येणारी खरेदीदारांची शिष्टमंडळे देशभरातील इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पांसाठी आवश्यक उपकरणांच्या गरजा मांडतील.

भूपिंदर सिंह, प्रेसिडेंट – प्रेसिडेंट आईएमईए, मेस्से मुएनचेन और सीईओ, मेस्से मुएनचेन इंडिया म्हणाले, "भारताच्या इन्फ्रास्ट्रक्चरशी संबंधित महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी अशा उपकरणांची गरज आहे, जी केवळ कागदावरच नव्हे तर प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणीही चांगली कामगिरी करतील. खरेदीदार आता फक्त मशीनची वैशिष्ट्ये पाहत नाहीत, तर तिची उत्पादकता, कोणत्याही अडथळ्याशिवाय काम करण्याची क्षमता, ऑपरेटिंग कॉस्ट आणि मशीनसोबत मिळणाऱ्या सपोर्ट नेटवर्कलाही महत्त्व देतात. बाउमा कॉनएक्सपो इंडिया संपूर्ण इक्विपमेंट इकोसिस्टमला एकाच व्यासपीठावर आणते. त्यामुळे खरेदीदार योग्य माहितीच्या आधारे गुंतवणुकीचे निर्णय घेऊ शकतात आणि बाजारातील मागणीचे प्रत्यक्ष व्यावसायिक संधींमध्ये रूपांतर करू शकतात."

बिल्डर्स एसोसिएशन ऑफ इंडिया चे नेशनल प्रेसिडेंट श्री. रविंद्र त्यागी म्हणाले, "कॉन्ट्रॅक्टर्ससाठी उपकरणे हा कोणत्याही प्रकल्पाचा अत्यंत महत्त्वाचा भाग असतो. योग्य मशीनमुळे काम लवकर पूर्ण करता येते, खर्च नियंत्रणात ठेवता येतो आणि कामाची गुणवत्ता सुधारते. मात्र चुकीच्या मशीनची निवड केल्यास मोठा खर्च आणि प्रकल्पाला विलंब होऊ शकतो. बाउमा कॉनएक्सपो इंडिया खरेदीदारांना विविध पर्याय तपासण्याची, सप्लायर्सना थेट प्रश्न विचारण्याची आणि त्यांच्या प्रकल्पासाठी योग्य मशीन, फायनान्स आणि दीर्घकालीन सपोर्ट मिळवण्याची संधी देते."

## भगवान वराह जयंतीनिमित्त पुण्यात मिरवणूक



**■ पुणे (दै. संध्या)**

श्री भगवान वराह जयंतीनिमित्त सकल हिंदू समाज, पुणे यांच्या वतीने १३ सप्टेंबर २०२६ रोजी पुण्यात धार्मिक व सामाजिक उत्साहात भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. या मिरवणुकीची सुरुवात सकाळी ११ वाजता होणार असून दुपारी २ वाजेपर्यंत मिरवणूक काढण्यात येणार आहे. कस्तुरे चौक ते श्री बालाजी मंदिर, भवानी पेठ असा मिरवणुकीचा मार्ग आहे. अशी माहिती सामाजिक व राजकीय विश्लेषक सर्वेश मेहेंदळे आणि युवा शेतकरी संघ, महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष रोहिदास बापू चोरघे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भगवान विष्णूंच्या वराह अवताराची कथा पृथ्वीच्या संरक्षणाशी जोडली जाते. हिरण्याक्षाने पृथ्वीला समुद्रात लपविल्यानंतर भगवान विष्णूंनी वराह रूप धारण करून पृथ्वीचे रक्षण केल्याचे पौराणिक कथेत सांगितले आहे. या पार्श्वभूमीवर वराह जयंतीच्या माध्यमातून पृथ्वी संरक्षण, पर्यावरण संवर्धन आणि भूमीच्या महत्त्वाचा संदेश देण्यात येत आहे. सध्याच्या काळात वाढते प्रदूषण, जंगलतोड आणि जागतिक तापमानवाढीमुळे पृथ्वीसमोर निर्माण झालेल्या संकटाकडेही या सोहळ्याच्या माध्यमातून लक्ष वेधण्यात आले आहे. पृथ्वीचे संरक्षण करणे हे प्रत्येक मानवाचे कर्तव्य असून भूमीचे संवर्धन आणि सेंद्रिय शेतीचा संकल्प करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# 'ग्लोबल एज्युकेशन फेअर २०२६'ला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**■ पुणे (दै. संध्या)**

परदेशात उच्च शिक्षण घेण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी 'स्टडी स्मार्ट'च्या वतीने आयोजित 'ग्लोबल एज्युकेशन फेअर 2026'ला पुण्यातील बोट क्लब येथे उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या फेअरमध्ये यूके, यूएसए, आयर्लंड, ऑस्ट्रेलिया, जर्मनी आणि दुबई येथील सुमारे 60 हून अधिक नामांकित विद्यापीठांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना थेट तज्ज्ञांशी संवाद साधण्याची संधी मिळाली.

विद्यार्थी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून परदेशी शिक्षणासंदर्भातील विविध पर्यायांची माहिती घेतली. विशेष म्हणजे, या ठिकाणी विद्यार्थ्यांना आणि पालकांना पूर्णपणे मोफत मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आले. परदेशात शिक्षण घेण्याबाबत विद्यार्थ्यांच्या मनात अनेक प्रश्न असतात—योग्य देश व विद्यापीठाची निवड, शैक्षणिक कर्जाची प्रक्रिया, उपलब्ध शिष्यवृत्ती (स्कॉलरशिप) तसेच प्रवेश प्रक्रिया यासारख्या मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन या फेअरमध्ये करण्यात आले. त्यामुळे उपस्थित विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधान झाले. 'स्टडी स्मार्ट'चे संचालक चेतन जैन यांनी सांगितले की, या फेअरमुळे विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांतील जागतिक शिक्षणाच्या संधींबाबत स्पष्ट दिशा मिळाली. यंदाच्या फेअरमध्ये 850 हून अधिक विद्यार्थी आणि 1200 हून अधिक पालकांनी सहभाग घेत मोफत मार्गदर्शनाचा लाभ घेतला. तसेच आतापर्यंत १२ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी या उपक्रमाच्या माध्यमातून परदेशातील विद्यापीठांची निवड केल्याची माहिती त्यांनी दिली.



## थोडक्यात पण महत्वाचे



### गणपती बाप्पाच्या विसर्जनासाठी माणुसकीचा पुढाकार!

**उरण : दैनिक संध्या**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर लाडक्या गणपती बाप्पाला निरोप देण्यासाठी नागांव तसेच परिसरातील भाविक मोठ्या संख्येने पिरवाड समुद्रकिनारी विसर्जनासाठी येत असतात. मात्र, समुद्राच्या लाटांमुळे किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात दगड जमा झाल्याने विसर्जनासाठी येणाऱ्या भाविकांना अडचणींचा सामना करावा लागण्याची शक्यता निर्माण झाली होती. ही बाब लक्षात घेऊन नागांव गावातील नागरिकांनी नागांव-म्हातवळी प्रकल्पग्रस्त अध्यक्ष तथा समाजसेवक वैभव यशवंत कडू यांच्याकडे रस्ता मोकळा करून देण्याची मागणी केली. नागरिकांची अडचण लक्षात घेत वैभव कडू यांनी कोणाचीही वाट न पाहता स्वखर्चाने समुद्रकिनारी विसर्जनासाठी जाणारा मार्ग मोकळा करून दिला. ‘गावकऱ्यांची अडचण ही आपलीच अडचण’ या भावनेतून केलेल्या या पुढाकारामुळे गणपती विसर्जनासाठी येणाऱ्या भाविकांना मोठा दिलासा मिळाला आहे. बाप्पाच्या विसर्जनासाठी येणाऱ्या प्रत्येक भक्ताला सुरक्षित व सुलभ मार्ग उपलब्ध व्हावा, हाच या कामामागील उद्देश असल्याचे वैभव कडू यांनी सांगितले. सामाजिक बांधिलकी जपत कोणत्याही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता स्वखर्चातून केलेल्या या उपक्रमाचे नागांव तसेच परिसरातील नागरिक आणि भाविकांकडून कौतुक होत असून, वैभव यशवंत कडू यांचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत. माणुसकीतून केलेली ही सेवा गणेशभक्तांसाठी खऱ्या अर्थाने ‘बाप्पाची सेवा’ ठरली आहे.

### गणेशोत्सवानिमित्त 'श्रीगणेशा आरोग्याचा' अभियान - जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी

**नारायणगाव : दैनिक संध्या**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून नागरिकांच्या सुदृढ आरोग्यासाठी राज्यभरात 'श्रीगणेशा आरोग्याचा' अभियान राबवण्यात येत आहे. या अभियानांतर्गत जिल्ह्यात १४ ते २५ सप्टेंबर या कालावधीत समुदाय आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्याचे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिले. मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष आणि सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या समन्वयाने ही मोहीम राबवली जात आहे. या शिबिरात उपलब्ध असणाऱ्या प्रमुख सेवा, विविध प्रकारच्या आरोग्य तपासण्या, आवश्यक रक्त चाचण्या, ईसीजी तपासणी, इतर अनुषंगिक व उपचारात्मक तपासण्या आणि मोफत औषधोपचार केले जाणार आहेत. ही शिबिरे यशस्वी करण्यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धर्मादाय आयुक्त, नगरपालिका प्रशासन, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी तसेच महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि समन्वयकांना जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

### जुन्नरची रणरागिणी, ज्येष्ठ नेत्या आशाताई बुचके यांचे निधन

**जुन्नर : दैनिक संध्या**

जुन्नर तालुक्याच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील ज्येष्ठ नेत्या, माजी जिल्हा परिषद सदस्या आणि सामाजिक कार्यकर्त्या आशाताई दत्तात्रय बुचके (६१) यांचे रविवारी (दि. १३) पहाटे मुंबईतील खासगी रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच जुन्नर तालुक्यात राजकीय, सामाजिक तसेच विविध क्षेत्रांत हळहळ व्यक्त करण्यात आली. त्यांच्या पश्चात पती, विवाहित मुलगा, दोन विवाहित मुली आणि नातवंडे असा परिवार आहे. आशाताई बुचके यांनी तब्बल चार वेळा पुणे जिल्हा परिषदेवर सदस्य म्हणून काम केले. जिल्हा परिषदेच्या गटनेत्या तसेच



जिल्हा नियोजन समितीच्या सदस्या म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली. ग्रामीण भागातील पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण आणि मूलभूत सुविधांच्या प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने आवाज उठविला. विकासकामांसाठी प्रशासनाकडे पाठपुरावा करणारे आणि सर्वसामान्यांच्या अडचणींना प्राधान्य देणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली होती. आशाताई बुचके यांनी राजकीय कारकिर्दीची सुरुवात शिवसेनेतून केली. सुमारे १५ वर्षे त्यांनी शिवसेनेत सक्रियपणे काम केले. त्यानंतर ऑगस्ट २०२१ मध्ये त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. भाजपमध्येही त्यांनी पक्षसंघटन आणि जनसंपर्काच्या माध्यमातून आपली सक्रियता कायम ठेवली. जुन्नर विधानसभा मतदारसंघातून चार वेळा त्यांनी विधानसभा निवडणूकही लढविली होती. आक्रमक आणि स्पष्टवक्त्या शैलीमुळे त्यांनी जुन्नर सह पुणे जिल्हातील राजकारणात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली.

# RealX आणि MST Blockchain ने भारतातील RWA टोकनायझेशनसाठी ‘The Box’ लॉन्च केले

**■ मुंबई (दै. संध्या)**

RealX आणि MST Blockchain यांनी Liminalच्या भागीदारीत आज ‘The Box’ हे स्वदेशी इन्फ्रास्ट्रक्चर स्टॅक लॉन्च केले. भारतात रिअल-वर्ल्ड ॲसेट्स (RWA) चे नियमन व अनुपालनाच्या चौकटीत टोकनायझेशन सक्षम करणे हा यामागील उद्देश आहे. World Trade Centre Mumbai हे या उपक्रमाचे इकोसिस्टम पार्टनर आहे. या लॉन्चद्वारे RealXचे REDbox आणि Whitebox सादर करण्यात आले असून, हे दोन्ही प्लॅटफॉर्म MST Blockchainच्या तंत्रज्ञानावर आधारित आहेत. भारतीय पायाभूत व्यवस्थेवर टोकनाइज्ड ॲसेट प्लॅटफॉर्म उभारण्यासाठी आवश्यक कायदेशीर, मार्केटप्लेस आणि ब्लॉकचेन इन्फ्रास्ट्रक्चर एकत्र आणण्याचे काम ते करतात.

RealXचे REDbox हे Platform-as-a-Service (PaaS) सोल्यूशन असून, त्याद्वारे रिअल इस्टेट डेव्हलपर्सना स्वतःच्या ब्रँड, वेबसाइट आणि ग्राहक माध्यमांद्वारे टोकनाइज्ड प्रॉपर्टी ऑफरिंग लॉन्च करता येतील. तर Whitebox हे ओपन-आर्किटेक्चर इन्फ्रास्ट्रक्चर लेयर आहे. याच्या माध्यमातून स्टार्टअप्स, कॉर्पोरेट्स आणि ॲसेट व्यवसायांना स्वतःच्या ब्रँडखाली RWA टोकनायझेशन प्लॅटफॉर्म उभारता येतील. दोन्ही प्लॅटफॉर्म MST Blockchainद्वारे संचालित आहेत. MST Blockchain हे एंटरप्राइज-रेडी भारतीय Layer-1 ब्लॉकचेन असून, सुरक्षित, स्केलेबल आणि ऑडिट करता येण्याजोग्या डिजिटल प्रणालींसाठी आवश्यक डिस्ट्रिब्युटेड लेजर इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करून देते. RealX कायदेशीररीत्या अंमलात आणता येतील अशा डिजिटल ॲसेट्सच्या निर्मितीसाठी कायदेशीर आणि अनुपालन चौकट उपलब्ध करून देते.

या इन्फ्रास्ट्रक्चरला भारतातील उदयोन्मुख RWA अर्थव्यवस्थेसाठी खुले आणि स्वदेशी व्यासपीठ म्हणून विकसित करण्याचा कंपन्यांचा उद्देश आहे. यामुळे डेव्हलपर्स आणि उद्योजकांना परदेशी प्लॅटफॉर्म किंवा तंत्रज्ञानावर अवलंबून न राहता टोकनायझेशन आधारित व्यवसाय उभारता येणार आहेत.



RealXचे सह-संस्थापक आणि CEO मनीष कुमार म्हणाले, “रिअल इस्टेटची मालकी डिजिटल आणि कायदेशीर अशा दोन्ही स्वरूपात शक्य आहे, हे सिद्ध करण्यापासून आम्ही सुरुवात केली. स्वतःच्या मार्केटप्लेसवर हे सिद्ध केल्यानंतर, ज्यांना याची गरज आहे अशा प्रत्येक डेव्हलपर आणि RWA प्लॅटफॉर्मसाठी हे इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करून देणे ही पुढची स्वाभाविक पायरी होती. REDbox आणि Whitebox हे त्याच दिशेने उचललेले पाऊल आहे.”

ते पुढे म्हणाले, “भारतातील टोकनायझेशन ही केवळ तंत्रज्ञानाची समस्या नाही; हा कायदेशीर अंमलबजावणीचा विषयदेखील आहे. टायटल डीड्सना कोडच्या माध्यमातून वगळता येत नाही; त्यांना लक्षात घेऊनच संपूर्ण व्यवस्था तयार करावी लागते.”

Masterstroke Technosoftचे चेअरमन आणि फाउंडर डायरेक्टर प्रमोद बोराटे म्हणाले, “ब्लॉकचेनला एक उदयोन्मुख तंत्रज्ञान म्हणून मर्यादित न ठेवता सरकारे, उद्योग आणि संस्थांसाठी व्यावहारिक इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये रूपांतरित करणे हे आमचे व्हिजन आहे. ब्लॉकचेनच्या पुढील टप्प्यातील स्वीकाराला रिअल-वर्ल्ड ॲप्लिकेशन्स चालना देतील. यात जमीन अभिलेख, डिजिटल क्रेडेन्शियल्स, ॲसेट टोकनायझेशन, सप्लाय चेन आणि सरकारी सेवांचा समावेश आहे.”

Liminalचे इंडिया हेड मनहर गारेग्राट म्हणाले, “टोकनायझेशनला प्रयोगाच्या टप्प्यातून संस्थात्मक स्वीकाराच्या दिशेने नेण्यासाठी अनुपालन, पारदर्शकता, सुरक्षा आणि मजबूत कस्टडी यांना एकत्र आणणाऱ्या इन्फ्रास्ट्रक्चरची गरज आहे. ‘The Box’सारखे ओपन इन्फ्रास्ट्रक्चर उपक्रम महत्त्वाचे आहेत, कारण ते रिअल-वर्ल्ड ॲसेट्सचे अधिक विश्वासार्ह पद्धतीने टोकनायझेशन आणि व्यवस्थापन करण्यासाठी मजबूत पाया तयार करतात आणि संपूर्ण इकोसिस्टमला मोठ्या प्रमाणावर विस्तार करण्याची संधी देतात.”

भारतामधील RWA इकोसिस्टम कायदेशीर, नियामक, आर्थिक आणि तंत्रज्ञानाच्या विविध पातळ्यांवर विकसित होत असताना हा लॉन्च झाला आहे. RealXने टोकनाइज्ड रिअल-वर्ल्ड ॲसेट्सशी संबंधित अनेक व्यावसायिक व्यवहार यापूर्वीच पूर्ण केले आहेत. दुसरीकडे, MST Blockchainने RWA टोकनायझेशन, जमीन व मालमत्ता अभिलेख, दस्तऐवज पडताळणी, सप्लाय-चेन ट्रेसेबिलिटी आणि डिजिटल गव्हर्नन्स अशा विविध क्षेत्रांसाठी ब्लॉकचेन इन्फ्रास्ट्रक्चर विकसित केले आहे.

## इलेक्ट्रॉनिका इंडिया आणि प्रोडक्ट्रॉनिका इंडिया २०२६ पुन्हा बेंगळुरूमध्ये

**■ मुंबई (दै. संध्या)**

भूपिंदर सिंह, प्रेसिडेंट – आईएमईए (भारत, मध्य पूर्व, अफ्रीका), मेस्से मुएनचेन आणि सीईओ , मेस्से मुएनचेन इंडिया म्हणाले, “भारताचा इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्र आता एका महत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचला आहे. मॅन्युफॅक्चरिंगचा विस्तार, धोरणात्मक पाठबळ आणि ग्लोबल व्हॅल्यू चेनमधील वाढती भागीदारी या क्षेत्राच्या वाढीला पुढे नेत आहेत. इलेक्ट्रॉनिका इंडिया आणि प्रोडक्ट्रॉनिका इंडिया 2026 चा मोठा विस्तार आणि आंतरराष्ट्रीय सहभाग हीच गती दर्शवतो. बेंगळुरूमध्ये आमचे लक्ष उद्योगाच्या महत्त्वाकांक्षा योग्य तंत्रज्ञान, पुरवठादार आणि भागीदारींसोबत जोडण्यावर आहे, ज्यामुळे मजबूत उत्पादन क्षमता विकसित होईल आणि चांगले व्यावसायिक परिणाम साधता येतील.”




इलेक्ट्रॉनिका इंडिया आणि प्रोडक्ट्रॉनिका इंडिया 2026 च्या नेशनल एडवाइजरी कमेटी चे सदस्य संजीव केसकर म्हणाले, “भारताच्या इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात मोठ्या संधी आहेत. मात्र ही वाढ कायम ठेवण्यासाठी देशांतर्गत क्षमता मजबूत करणे आणि प्रगत मॅन्युफॅक्चरिंग तंत्रज्ञानाचा वेगाने स्वीकार करणे आवश्यक आहे. ही प्रदर्शने निर्णय घेणाऱ्यांना वेगवेगळ्या उपायांची तुलना करण्याची, भारतीय आणि आंतरराष्ट्रीय पुरवठादारांशी थेट संपर्क साधण्याची आणि पुढील विस्तारासाठी आवश्यक तंत्रज्ञान व भागीदारी ओळखण्याची प्रत्यक्ष संधी देतात.”

डॉ. रेनहार्ड फाइफर, सीईओ, मेस्से मुएनचेन जीएमबीएच म्हणाले, “भारत जागतिक इलेक्ट्रॉनिक्स उद्योगात वेगाने प्रभावी भूमिका बजावत आहे.

भारत केवळ वेगाने वाढणारी बाजारपेठ नाही, तर एक उदयोन्मुख मॅन्युफॅक्चरिंग बेसही आहे. 50 पेक्षा अधिक देशांतील प्रदर्शक आणि अभ्यागतांचा सहभाग या प्लॅटफॉर्मचे आंतरराष्ट्रीय महत्त्व दाखवतो. हा कार्यक्रम भारतीय आणि जागतिक कंपन्यांना तंत्रज्ञानाची देवाणघेवाण, भागीदारी विकसित करणे आणि भारताच्या इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राच्या पुढील वाढीत योगदान देण्यासाठी महत्त्वाच्या संधी देतो.”

## आईकूने केला ७२००एमएएच बॅटरी आणि मीडियाटेक डाइमेंसिटी ७४००-टर्बो सह जेड ११ एक्सए 5 जी लाँच

**■ नवी दिल्ली (दै. संध्या)**

उच्च-कार्यक्षमता असलेल्या स्मार्टफोन ब्रँड आईकू ने आजआईकू जेड 11 एक्सए 5 जी लाँच केला, जो आजच्या विद्यार्थ्यांच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केला आहे. हा स्मार्टफोन अशा विद्यार्थ्यांसाठी डिझाइन केला आहे जे एकाच वेळी अनेक कामे करतात— ज्यात ऑनलाइन क्लासेस, संशोधन, असाइनमेंट्स, मनोरंजन, गेमिंग आणि प्रवासातही कनेक्टेड राहणे यांचा समावेश आहे. हा स्मार्टफोन त्यांच्या वेगवान, डिजिटल-फर्स्ट जीवनशैलीला समर्थन देण्यासाठी शक्तिशाली कार्यक्षमता, दीर्घकाळ टिकणारी बॅटरी, मजबुती आणि एआई -सक्षम वैशिष्ट्ये एकत्र आणतो.

आईकू च्या जेड -सिरीज लाइनअपला अधिक मजबूत करत, आईकू जेड 11 एक्सए 5 जी मध्ये 4एनएम प्रक्रियेवर तयार केलेला मीडियाटेक डाइमेंशन 7400-टर्बोप्रोसेसर, 44डब्ल्यू फ्लॅशचार्जसह 7200एमएएच बॅटरी आणि आई पी 68 व आई पी69 धूळ आणि पाणी



प्रतिरोधक क्षमता आहे. या स्मार्टफोनमध्ये 120हर्ट्ज़ फ्रेश रेट असलेला 6.76-इंचाचा एफएचडी+ एलसीडी डिस्प्ले, ५० मेगापिक्सेल चा सोनीचा मुख्य कॅमेरा सेन्सर आणि 32एमपी चा फ्रंट कॅमेरा आहे. हा स्मार्टफोन अँड्रॉइड 16 वर आधारित ओरिजिनओएस 6 वर चालतो. आईकू जेड 11 एक्सए 5 जी च्या 8जीबी + 128जीबी व्हेरिएंटची किंमत ₹28,999 (निव्वळ प्रभावी किंमत: ₹27,499) आहे. हा टायटन ब्लॅक आणि प्रिझमॅटिक ग्रीन या दोन रंगांमध्ये उपलब्ध असेल. याची विक्री 14 सप्टेंबर रोजी दुपारी 12 वाजल्यापासून निवडक Vivo एक्सक्लुझिव्ह स्टोअर्स आणि इतर रिटेल आउटलेट्सवर सुरू होईल.

## सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे १७ ते २४ सप्टेंबरदरम्यान ‘गणेशोत्सव २०२६ शास्त्रीय संगीत महोत्सव’

**■ मुंबई (दै. संध्या)**

गणेशोत्सवाला ‘राज्य महोत्सव’ म्हणून मान्यता मिळाल्यानंतर गणेशोत्सवाच्या निमित्ताने प्रथमच मुंबईकरांना शास्त्रीय संगीताची विशेष मेजवानी अनुभवता येणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने ‘गणेशोत्सव 2026 शास्त्रीय संगीत महोत्सवा’चे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव 17 ते 24 सप्टेंबर 2026 दरम्यान दररोज सायंकाळी 6.30 वाजता मिनी थिएटर, तिसरा मजला, रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मुंबई येथे होणार आहे.

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील महत्त्वाचा उत्सव असून, त्याला संगीत, कला, भक्ती आणि लोकपरंपरेची समृद्ध परंपरा लाभली आहे. राज्य महोत्सवाचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर या उत्सवाच्या माध्यमातून विविध कलाप्रकारांना व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून आयोजित या शास्त्रीय संगीत महोत्सवातून आठ दिवस विविध नामवंत कलाकारांच्या गायन व वादनाची सुरेल मेजवानी रसिकांना मिळणार आहे. अभिजात शास्त्रीय संगीताची परंपरा जतन, संवर्धन करून ती नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे हा या महोत्सवाचा प्रमुख उद्देश आहे. महोत्सवाची सुरुवात 17 सप्टेंबर रोजी सुभद्रा देसाई यांच्या गायनाने होणार असून, त्याच दिवशी एस. आकाश आणि मेहताब अली नियाझी यांचे बासरी आणि सतार युगल वादन सादर होणार आहे. शुक्रवार, 18 सप्टेंबर रोजी स्वर शर्मा आणि अनुजा झोकरकर यांचे गायन, शनिवार, 19 सप्टेंबर रोजी नूपुर गाडगीळ आणि नागेश आडगावकर यांचे गायन, तर रविवार, 20 सप्टेंबर रोजी मृणालिनी देसाई यांचे रुद्रवीणा वादन आणि गंधार देशपांडे यांचे गायन सादर होणार आहे. सोमवार, दि. 21 सप्टेंबर रोजी प्राजक्ता मराठे यांचे गायन आणि यज्ञेश रायकर यांचे व्हायोलिन वादन, मंगळवार, 22 सप्टेंबर रोजी धनंजय हेगडे यांचे गायन तसेच यशवंत वैष्णव आणि सुखद मुंडे यांचे तबला आणि पखवाज युगल वादन, बुधवार,23 सप्टेंबर रोजी विनय रामदासन यांचे गायन आणि अभिषेक बोरकर यांचे सरोद वादन, तर महोत्सवाच्या समारोपाच्या दिवशी गुरुवार, 24 सप्टेंबर रोजी केदार केळकर यांचे गायन तसेच अपूर्वा गोखले आणि पल्लवी जोशी यांचे युगल गायन सादर होणार आहे. विविध गायन व वादन प्रकारांमधून शास्त्रीय संगीताची वैविध्यपूर्ण अनुभूती रसिकांना या महोत्सवाच्या माध्यमातून घेता येईल.

महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशातील शास्त्रीय संगीताची अभिजात परंपरा जपणे, संवर्धित करणे, कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि संगीतप्रेमी रसिकांना दर्जेदार शास्त्रीय संगीताचा अनुभव उपलब्ध करून देणे, हा या महोत्सवामागील प्रमुख उद्देश आहे.

## बॉमा कॉनएक्सपो इंडिया २०२६ मध्ये बांधकाम आणि महामार्गाबाहेरील उपकरणांसाठी प्रगत उपाय सादर करणार एनबीसी बेअरिंग्स

**■ पुणे (दै. संध्या)**

नॅशनल इंजिनिअरिंग इंडस्ट्रीज लिमिटेड (एनईआय) चा प्रमुख बेअरिंग ब्रँड एनबीसी बेअरिंग्स बॉमा कॉनएक्सपो इंडिया २०२६ मध्ये सहभागी होणार आहे. हे प्रदर्शन १५ ते १८ सप्टेंबर २०२६ दरम्यान इंडिया एक्स्पो सेंटर, ग्रेटर नोएडा येथे आयोजित केले जाणार आहे. यावेळी कंपनी बांधकाम आणि महामार्गाबाहेरील उपकरणांसाठी आपल्या वाढत्या उत्पादन श्रेणीचे प्रदर्शन करणार असून, टिकाऊपणा, कार्यक्षमता आणि विविध गरजांनुसार विकसित केलेल्या अभियांत्रिकी उपायांवर विशेष भर दिला जाणार आहे.

नॅशनल इंजिनिअरिंग इंडस्ट्रीज लिमिटेडचे मुख्य विक्री आणि विपणन अधिकारी राजेश प्रेमचंद्रन म्हणाले, “बांधकाम आणि महामार्गाबाहेरील उपकरणे अत्यंत कठीण परिस्थितीत काम करतात. अशा वेळी उपकरणांमधील भागांची विश्वासार्हता यंत्र किती काळ कार्यरत राहते आणि त्याची उत्पादकता यावर थेट परिणाम करते. एनबीसी बेअरिंग्समध्ये आम्ही उद्योग क्षेत्रासोबत जवळून काम करून त्यांच्या आव्हानांना समजून घेतो आणि प्रत्यक्ष कामकाजाच्या परिस्थितीनुसार योग्य उपाय विकसित करतो. बॉमा कॉनएक्सपो इंडिया आम्हाला आमच्या अभियांत्रिकी क्षमतांचे प्रदर्शन करण्यासाठी तसेच उपकरण उत्पादकांच्या बदलत्या तांत्रिक गरजा समजून घेण्यासाठी आणि त्यावर चर्चा करण्यासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध करून देते.”




बांधकाम क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या उपकरणांना जड भार, धक्के, कंपन, धूळ, दूषित वातावरण आणि दीर्घकाळ सतत काम करणे अशा कठीण परिस्थितींचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत उपकरण उत्पादक उत्पादकता वाढवणे, यंत्रे अधिक काळ कार्यरत ठेवणे आणि त्यांची कार्यक्षमता सुधारणे यावर अधिक भर देत आहेत. त्यामुळे बेअरिंगसारख्या महत्त्वाच्या भागांची गुणवत्ता आणि कामगिरी अधिक महत्त्वाची ठरत आहे.

बॉमा कॉनएक्सपो इंडिया २०२६ मध्ये एनबीसी बेअरिंग्स आपल्या अभियांत्रिकी क्षमता आणि विविध उपकरणांशी संबंधित तांत्रिक ज्ञानाच्या मदतीने या आव्हानांवर कशा प्रकारे मात करता येते, हे दाखवणार आहे. जास्त भार सहन करण्याची क्षमता, टिकाऊपणा आणि सातत्यपूर्ण कामगिरी आवश्यक असलेल्या उपकरणांसाठी विकसित केलेले उपाय कंपनी येथे सादर करेल.

कंपनी या प्रदर्शनात बांधकाम उपकरण क्षेत्रासाठी नवीन बेअरिंग उपाय देखील सादर करणार आहे. यामुळे या क्षेत्रासाठी कंपनीची उत्पादन श्रेणी आणखी मजबूत होईल. प्रदर्शनादरम्यान सादर करण्यात येणारी ही नवीन उत्पादने उपकरणांच्या बदलत्या रचना आणि कामकाजाच्या परिस्थिती लक्षात घेऊन विकसित करण्यात आली आहेत.

बांधकाम उपकरण क्षेत्रात स्थानिक पातळीवरील उत्पादन, अधिक कार्यक्षमता आणि उपकरणांचे आयुष्य वाढवण्यावर भर दिला जात असताना एनबीसी बेअरिंग्स उत्पादन अभियांत्रिकी, उत्पादन निर्मिती आणि तांत्रिक सहाय्याच्या आपल्या क्षमता सातत्याने मजबूत करत आहे. बॉमा कॉनएक्सपो इंडियामधील कंपनीच्या सहभागामुळे मूळ उपकरण उत्पादक आणि इतर उत्पादकांसोबत नवीन तंत्रज्ञान तसेच भविष्यातील उपकरणांच्या गरजांवर चर्चा करण्याची संधी मिळेल.

प्रदर्शनादरम्यान कंपनीचे तांत्रिक तज्ज्ञ आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. ते बांधकाम उपकरणांच्या विविध श्रेणींमधील वापर, उत्पादनांची कामगिरी आणि भविष्यातील गरजांबाबत उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींशी चर्चा करतील.

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे**

(महाराष्ट्र शासन अंगीकृत उपक्रम)

कार्यकारी अभियंता, चासकमान पाटबंधारे विभाग, पुणे यांचे कार्यालय

पत्ता :- नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कॉन्सिल हॉल समोर, पुणे ४११००१

ई-मेल :- eecidpune@gmail.com दूरध्वनी क्रं. ०२०-२६१२३९०२

**ई-निविदा सूचना क्र.०८ सन २०२६-२७**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, चासकमान पाटबंधारे विभाग, पुणे १, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे **सक्षम निविदाकारांकडून** ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, चासकमान पाटबंधारे विभाग, पुणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| **कामाचे नांव** | : | चासकमान धरणाच्या अधोबाजूस पोहोच रस्ते व त्यावरील १ लादी पूल व ४ नलिका मोरींची कामे व इतर तदनुषंगिक कामे करणे. |
| **जिल्हा** | : | पुणे |
| **निविदेची किंमत रुपये** | : | रू.७३९.३० लक्ष |
| **ई-निविदा उपलब्ध कालावधी** | : | दिनांक : १५/०९/२०२६ ते २९/०९/२०२६ |
| ई-निविदा उघडण्याचा दिनांक | : | दिनांक : ०१/१०/२०२६ |

जा.क्रं. चापावि/लेशा/निविदा/३१११/सन २०२६

कार्यकारी अभियंता

चासकमान पाटबंधारे विभाग, पुणे १ यांचे कार्यालय

दिनांक :- ०९/०९/२०२६

**क्रमांक : आरओसी-२०२६-२७/क्र-५/C२८०६**

सही/-

**(इंजि. मो. ता. जाधवर)**

कार्यकारी अभियंता

चासकमान पाटबंधारे विभाग, पुणे १

## थोडक्यात पण महत्वाचे



### पिंपरी चिंचवड पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी प्रविण शिर्के

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी चिंचवड पत्रकार संघाची शुक्रवारी (दि. २१) पिंपरी येथे झालेल्या बैठकीत सर्वांनूमते पुढील कार्यकारणीची निवड करण्यात आली. यामध्ये पिंपरी चिंचवड पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी प्रविण शिर्के, कार्याध्यक्ष प्रविण (बाबु) कांबळे, उपाध्यक्ष अविनाश पर्बत, बद्रिनारायन घुगे, विकास साळवे, सरचिटणीस ओमप्रकाश पांडे, खजिनदार दिनेश दुधाळे, सहखजिनदार संजय धुतडमल, कार्यकारीणी सदस्य गोविंद देशपांडे, प्रदीप सपकाळ, सारीका भिंगे, पंकज लालझरे, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती अनिल भालेराव, सल्लागार बाळासाहेब ढसाळ यांनी निवड करण्यात आली आहे. तसेच महिला अध्यक्षपदी माधुरी कोराड, महिला उपाध्यक्षा श्रध्दा प्रभुणे यांची निवड करण्यात आली. पिंपरी चिंचवड डिजीटल पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी राम बनसोडे, कार्याध्यक्ष देवा भालके, उपाध्यक्ष गौरव साळुंखे, विकास चौधरी, मुझफ्फर इनामदार, सरचिटणीस भिमराव बरगडे, सहसरचिटणीस निलेश सायकर, खजिनदार श्याम सोनवणे, सहखजिनदार शेहनाज कुरणे, कार्यकारीणी सदस्य शैलेष जाधव, सचिन सोनवणे, संजय राजगुरू यांची यावेळी निवड करण्यात आली.

### देहू–आळंदी मेट्रो मार्गासाठी सुनेत्रा पवार यांच्याकडे पाठपुरावा

**पिंपरी : दैनिक संध्या**

देहू–आळंदी प्रस्तावित मेट्रो मार्गासह प्रभागातील विविध विकासकामे आणि नागरिकांच्या प्रलंबित प्रश्नांना गती मिळावी, यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक यश साने यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची पुण्यात सदिच्छा भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. देहू ते आळंदी हा प्रस्तावित मेट्रो मार्ग परिसरातील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासह नागरिकांना सक्षम, जलद आणि सुलभ सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला शासनस्तरावर आवश्यक गती मिळावी, यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. याशिवाय प्रभागातील विविध विकासकामे, पायाभूत सुविधांशी संबंधित प्रश्न, नागरिकांच्या मूलभूत समस्या तसेच अनेक प्रलंबित कामांबाबत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली. संबंधित मागण्यांचे निवेदन सादर करून त्यावर सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली. यावेळी, "नागरिकांच्या समस्या सोडविणे आणि प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा करणे हीच माझी भूमिका आहे. विकासकामांना गती देऊन नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पुढेही प्रामाणिकपणे प्रयत्नशील राहणार आहे," असे मत व्यक्त करण्यात आले. या प्रसंगी नगरसेवक पंकज भालेकर, मार्गदर्शक विष्णू मोरे पाटील, सामाजिक कार्यकर्ते अमृत अप्पा सोनवणे, प्रदीप भाऊ आहेर, दत्तात्रय भाऊ मोरे, बाळासाहेब (दादा) मोरे, रामभाऊ मोरे, देविदास भाऊ कारले आणि नवनाथ भाऊ भोसले आदी उपस्थित होते.

### कॉपर चोरणाऱ्या टोळीचा पर्दाफाश, १९ लाख ८४ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या युनिट-४ पथकाने कॉपर चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत तब्बल १९ लाख ८४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत सहा आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून तळेगाव एमआयडीसी, चिखली आणि देहूरोड परिसरातील एकूण ९ गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलीस आयुक्तालय हद्दीत गुन्हे प्रतिबंधक गस्त घालत असताना सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक राजाराम लोणकर आणि पोलीस शिपाई रामदास मेरगळ यांना गुप्त माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी कारवाई करून सहा संशयितांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून १८ लाख ७४ हजार रुपयांचे कॉपर, एक चारचाकी वाहन आणि आयशर वाहन जप्त करण्यात आले. पासादरम्यान आरोपींनी तळेगाव एमआयडीसी व चिखली परिसरातील विविध ठिकाणांवरील वीज वितरण ट्रान्सफॉर्मर (डीपी) मधील कॉपर वायर आणि केबल चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी पडताळणी केली असता तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यातील सहा आणि चिखली पोलीस ठाण्यातील दोन असे एकूण आठ गुन्हे या टोळीशी संबंधित असल्याचे निष्पन्न झाले. याचबरोबर गुन्हे शाखा युनिट-४ पथकाने देहूरोड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या केबल चोरीच्या गुन्ह्याचा समांतर तपास करत सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपी अजय प्रल्हाद गायकवाड (रा. चिखली) याला अटक केली. त्याच्याकडून केबल वायर, दोन ग्राइंडर मशीन, दोन रेग्युलेटर आणि गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल असा १ लाख १० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यातील सहा, चिखली पोलीस ठाण्यातील दोन आणि देहूरोड पोलीस ठाण्यातील एक असे एकूण नऊ गुन्हे उघडकीस आले आहेत. ही उल्लेखनीय कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक अर्जुन घोडेपाटील यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीधर भोसले व गुन्हे शाखा युनिट-४, सहायक पोलीस फौजदार लोणकर, वायभसे, पोलीस हवालदार मोरे, महाडीक, सोडगीर, असवले, सोनटक्के, बोराटे, पोलीस शिपाई मेरगळ, वेताळ, खेडकर, सुखदाने, मुंडे, नागरे, सोनवणे, बाळसराफ, खराडे, माटे तसेच तांत्रीक विश्लेषन शाखेकडील सहायक पोलीस फौजदार माळी, पोलीस हवालदार ननावरे, पोलीस शिपाई कारके यांनी केली आहे.

### संत ज्ञानेश्वर महाराजांनी सर्वसामान्यांपर्यंत अध्यात्म पोहोचविले

**पिंपरी : दैनिक संध्या**

संत ज्ञानेश्वर महाराजांनी भावार्थ दिपिका हा ग्रंथ लिहून सर्वसामान्यांपर्यंत अध्यात्म पोहोचविण्याचे मोठे काम केले. त्यांचे हे कार्य लक्षात घेता अध्यात्मिक लोकशाहीचे जनक म्हणून ज्ञानेश्वर महाराजांचा उल्लेख करावा लागेल असे प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक संजय कुलकर्णी यांनी केले. ज्ञानेश्वर महाराजांच्या जयंतीनिमित्त पिंपळे सौदागर येथील श्री संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्थेच्या मासिक सभेत ते बोलत होते. शनिवार दि. १२ रोजी सायंकाळी बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणाच्या परिसरात हा कार्यक्रम झाला. प्रारंभी विलास भाले, अक्षय वडनेरकर, शैलजा लोकरस, मंगला कुलकर्णी , मीनाक्षी कुलकर्णी, अनुराधा निलेगावकर यांच्याहस्ते ज्ञानेश्वर महाराजांचे प्रतिमा पूजन आणि दिपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर उषा भागवत, शशिकांत कुलकर्णी, मीनाक्षी कुलकर्णी यांनी भक्तीगीते सादर केली. अक्षय वडनेरकर यांनी घरातील प्रत्येक कुटुंबप्रमुखाने पुढील पिढीला आपल्या घराण्याची परंपरा, चालीरीती, कुलधर्म याबाबत माहिती देण्याचे आवाहन केले. भाग्यश्री गोखले यांनी संस्थेतील सभासदांच्या कुटुंब सहलीचे वर्षातून एकदा नियोजन करण्याची सुचना मांडली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेंद्र कुलकर्णी यांनी केले. अध्यक्षीय समारोप विलास जोशी यांनी केला.



# पवना नदी प्रदूषणाचा प्रश्न गंभीर!

■ **पिंपरी : (दै. संध्या)**

पवना नदी प्रदूषण नियंत्रण आणि नदी पुनरुज्जीवनाबाबत सरकारकडून सातत्याने आश्वासने दिली जात असताना आता राज्य सरकारने राष्ट्रीय हरित लवादासमोर या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध नसल्याचे स्पष्ट केले आहे. शासनाच्या निधीवर अवलंबून असलेल्या या प्रकल्पाच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पवना नदीच्या प्रदूषणासंदर्भातील सुरू असलेल्या प्रकरणात राष्ट्रीय हरित लवादाने राज्य सरकार, राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालय (एनआरसीडी) आणि पिंपरी-चिंचवड महापालिका यांनी एकत्र येऊन प्रदूषण नियंत्रणाच्या कामांसाठी निश्चित आराखडा व कालबद्ध कार्यक्रम सादर करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, त्यानंतर संबंधित संस्थांनी नुकत्याच दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रांमधून निधीचा गंभीर पेच निर्माण झाल्याचे समोर आले आहे. राज्य सरकारने या प्रकल्पासाठी आपल्याकडे निधी उपलब्ध नसल्याचे म्हटले आहे. तर, 'एनआरसीडीने'ही (राष्ट्रीय नदी संवर्धन संचलनालय) निधी उपलब्ध नसल्याचे स्पष्ट करून पिंपरी-चिंचवड महापालिकेने इतर स्रोतांमधून निधी उपलब्ध करण्याचे पर्याय शोधावेत, अशी भूमिका घेतली आहे.

यामुळे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) प्रस्तावित कामांबाबतही अनिश्चितता निर्माण झाली आहे. विशेषतः राज्य किंवा केंद्र सरकारच्या निधीवर अवलंबून असलेल्या प्रकल्पांच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पवना नदी प्रदूषणाच्या प्रश्नावर अनेक वर्षांपासून आश्वासने आणि घोषणा करण्यात येत आहेत. मात्र, प्रत्यक्षात प्रदूषण नियंत्रणाच्या कामांना अपेक्षित गती मिळालेली नाही. देशातील अत्यंत प्रदूषित नदीपट्ट्यांमध्ये पवना नदीचा समावेश झाल्याने मावळ व पिंपरी-चिंचवड परिसरासह पुण्याकडे आणि पुढे उजनी खोऱ्यापर्यंतच्या भागातील पर्यावरण व सार्वजनिक आरोग्यावर याचा परिणाम होत असल्याची चिंता नागरिकांनी व्यक्त केली आहे.

सन 2024-25 च्या आर्थिक विवरणपत्रानुसार पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे सुमारे 4 हजार 899 कोटी 71 लाख रुपयांच्या बँक मुदत ठेवी होत्या. महापालिकेची गुंतवणूक आणि बँक शिल्लक मिळून सुमारे 8 हजार 125 कोटी रुपये इतकी रक्कम आहे. संबंधित आर्थिक वर्षात महापालिकेला सुमारे 407 कोटी रुपयांचे उत्पन्न व्याजातून मिळाले आहे. इतकी भक्कम आर्थिक स्थिती असताना पवना नदीसारख्या महत्त्वाच्या पर्यावरणीय प्रश्नासाठी बाह्यनिधीची प्रतीक्षा का केली जात आहे. स्वतःच्या आर्थिक स्रोतांचा वापर करून पवना नदी प्रदूषण नियंत्रणाचे काम का हाती घेतले नाही, असा प्रश्न या प्रकरणात हरित लवादामध्ये याचिका दाखल करणारे ॲड. कृणाल घर्रे यांनी उपस्थित केला आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या सन 2019 च्या आदेशानंतर पिंपरी-चिंचवड महापालिकेने पवना नदी प्रदूषण नियंत्रणाशी संबंधित कामे सन 2021 पर्यंत पूर्ण करण्याचे ग्वाही दिली होती. मात्र, ते पूर्ण झाले नाही. सध्याच्या हरित लवादाच्या प्रकरणातही महापालिकेने कामे पूर्ण करण्याची ग्वाही दिली होती. मात्र, प्रकल्प अद्याप अपूर्ण असून, एनआरसीडीकडून निधी न मिळाल्याचे कारण विलंबासाठी देण्यात आले आहे. आता राज्य सरकार आणि एनआरसीडी या दोन्ही संस्थांनी निधी उपलब्ध नसल्याची भूमिका घेतल्याने महापालिका आणखी किती काळ प्रतीक्षा करणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच, आर्थिक क्षमता असूनही प्रकल्पाच्या अंमलबजावणीत विलंब होत राहिल्यास संबंधित महापालिकेकडून पर्यावरणीय नुकसानभरपाई व जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करण्यात येईल, असा इशाराही ॲड. घर्रे यांनी दिला आहे.

## विद्यार्थ्यांच्या हातून साकारला पर्यावरणपूरक बाप्पा

■ **पिंपरी(दै. संध्या)**

पर्यावरण संवर्धनाची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासोबतच गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने शहराच्या विविध भागांत जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून 'स्वच्छ सर्वेक्षण २०२६' आणि 'माझी वसुंधरा ७.०' अभियानांतर्गत 'ग' क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रभाग क्रमांक २३ मधील यशवंतराव चव्हाण विद्यालय, थेरगाव येथे विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी शाडू माती व नैसर्गिक साहित्याचा वापर करून गणेशमूर्ती साकारत पर्यावरणपूरक



गणेशोत्सवाचा संदेश दिला.

महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम आणि उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाकडून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत शहरात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. गणेशोत्सवाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि नागरिकांच्या सहभागाचा संदेश देण्यावर महापालिकेचा भर आहे.

पिंपरी चिंचवड महापालिका आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी शाडू माती तसेच नैसर्गिक साहित्याचा वापर करून गणेशमूर्ती तयार केल्या तसेच, यावेळी पुनर्वापर करता येणाऱ्या साहित्यापासून सजावट करण्याचे आवाहन करण्यात आले. कागद, कापड, बांबू, पाने आणि नैसर्गिक फुलांचा वापर करून सजावट करण्यास प्रोत्साहन देण्यात आले. तसेच थर्माकोल आणि एकदा वापरून फेकून देण्यात येणाऱ्या प्लास्टिकचा वापर टाळण्याबाबत विद्यार्थी व शिक्षकांमध्ये जनजागृती देखील करण्यात आली.

## दर्शन अपॅरल्स तर्फे पिंपरी येथे 'जस्ट कॅज्युअल्स'च्या नव्या स्टोअरचे उद्‌घाटन

■ **पिंपरी (दै. संध्या)**

संपूर्ण कुटुंबाच्या कपड्यांच्या खरेदीसाठी लोकप्रिय असलेल्या 'जस्ट कॅज्युअल्स' या ब्रँडने पिंपरी-चिंचवडमध्ये आपला विस्तार करत पिंपरी येथे नवीन स्टोअर सुरू केले आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या इमारतीसमोरील ब्रम्हा स्काय उजुरी या इमारतीत हे स्टोअर सुरू करण्यात आले आहे.

नवीन स्टोअरचे उद्‌घाटन कुटुंबातील ज्येष्ठ सदस्य लेखा छाब्रिया, सीतल अहुजा, लविना अहुजा तसेच हरिराम सी. भतिजा यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या नव्या स्टोअरमुळे दर्शन अपॅरल्सच्या 'जस्ट कॅज्युअल्स'ची पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील एकूण स्टोअर्सची संख्या १२ वर पोहोचली आहे.

ावेळी बोलताना 'जस्ट कॅज्युअल्स'चे कुणाल अहुजा म्हणाले की, "नुकतेच 'जस्ट कॅज्युअल्स'ने ग्राहकसेवेची २५ वर्षे पूर्ण केली आहेत.

त्याच वर्षात पिंपरी येथे नवीन स्टोअर सुरू होणे हा आमच्यासाठी अभिमानाचा आणि आनंदाचा क्षण आहे. फॅशन सर्वसामान्यांना किफायतशीर दरात आणि सहज उपलब्ध करून देण्यावर आमचा नेहमीच भर राहिला आहे." 'जस्ट कॅज्युअल्स'मध्ये पुरुष, महिला आणि लहान मुलांसाठी कॅज्युअल वेअर, सेमी-फॉर्मल वेअर, लाउंज वेअर आणि ॲथलीजर अशा विविध प्रकारच्या कपड्यांचा विस्तृत संग्रह उपलब्ध आहे.

## भरधाव थार चालकाचा शिवार चौकात थरार

■ **पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरातील पिंपळे सौदागर येथील गजबजलेल्या शिवार चौकात भरधाव थार चालकाने पोलिसांच्या कारवाईला न जुमानता धक्कादायक थरार घडविल्याची घटना समोर आली आहे. पोलिसांनी अडवूनही वाहनासह पसार झालेल्या चालकाविरोधात पोलिसांनी विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करून कडक कारवाई केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी (दि.११ सप्टेंबर) सायंकाळी सव्वासातच्या सुमारास एमएच 14 एम क्यू 77 क्रमांकाची काळ्या रंगाची थार गाडी बीआरटी मार्गावरून भरधाव वेगाने येत होती. वाहनाच्या काचांवर बेकायदेशीर ब्लॅक फिल्म लावण्यात आल्याचे निदर्शनास आले. शिवार चौकात तैनात असलेल्या पोलिसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला असता चालकाने वाहन थांबविण्याऐवजी पळून जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी वाहन मागे घेताना चालकाने एका दुचाकीला जोरदार धडक दिली. त्यानंतरही तो न थांबता कर्तव्यावर असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांनी अडवूही घटनास्थळावरून पसार झाला. या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ तपास सुरू करून संबंधित वाहनाचा माग काढला. तपासादरम्यान थार वाहन सुयश उर्फ कृष्णा काटे हा चालवत असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी त्याच्याविरोधात सरकारी कामात अडथळा आणणे, अपघात करून पळून जाणे तसेच वाहनावर बनावट क्रमांक प्लेट वापरणे आदी गंभीर आरोपांखाली गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत असून आरोपीविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश

■ **पिंपरी(दै. संध्या)**



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या 'ड' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक २७ मधील कै. भिकोबा तांबे प्राथमिक शाळा व मेमोरियल हायस्कूल येथील विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करण्याबरोबरच नागरिकांनाही पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले.

क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड, सहाय्यक आरोग्य अधिकारी राजू साबळे, मुख्य आरोग्य निरीक्षक शंकर घाटे, आरोग्य निरीक्षक गणेश राजगे तसेच आरोग्य मुकादम प्रदीप जगताप, आबासाहेब कदम, किरण त्रिभुवन आणि डिवाईन सुपरवायझर यश लोंढे यांच्या मार्गदर्शनाखाली डिवाईन वेस्ट मॅनेजमेंट अँड सर्व्हिसेसच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत जनजागृती करण्यात आली तसेच गणेशमूर्ती स्पर्धेचे आयोजन करून सहभागी विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम आणि उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्या मार्गदर्शनाखाली शहरभर 'माझी वसुंधरा ७.०' आणि 'स्वच्छ सर्वेक्षण २०२६' अभियानांतर्गत पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत जनजागृती सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून हा उपक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी गणेशोत्सवात प्लास्टिकचा वापर टाळणे, नैसर्गिक व पर्यावरणपूरक सजावटीला प्राधान्य देणे आणि परिसर स्वच्छ ठेवणे याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

# गणेशोत्सव काळात वीजपुरवठा अखंडित ठेवा : नाना काटे

■ **पिंपळे सौदागर (दै. संध्या)**

पिंपळे सौदागर, रहाटणी व काळेवाडी परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून येत आहेत. आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर या समस्येची तातडीने दखल घेऊन गणेशोत्सव काळात परिसरात सुरळीत व अखंडित वीजपुरवठा ठेवावा, अशी मागणी मा. विरोधी पक्षनेते तथा नगरसेवक श्री. विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी महावितरणचे सहाय्यक अभियंता श्री. सुनील कदम यांच्याकडे केली आहे.

गणेशोत्सव हा नागरिकांच्या श्रद्धेचा, भक्तीचा आणि उत्साहाचा सण आहे. या काळात परिसरातील विविध गणेश मंडळांकडून धार्मिक, सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. अशा वेळी वारंवार वीजपुरवठा खंडित झाल्यास गणेश मंडळांसह नागरिकांची मोठी गैरसोय होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे गणेशोत्सव सुरू होण्यापूर्वी परिसरातील वीजवाहिन्या, ट्रान्सफॉर्मर, फिडर तसेच विद्युत यंत्रणेची पूर्वतपासणी व आवश्यक देखभाल करण्यात यावी. संभाव्य तांत्रिक बिघाड लक्षात घेऊन आवश्यक मनुष्यबळ व दुरुस्ती यंत्रणा सज्ज ठेवावी आणि वीजपुरवठा खंडित झाल्यास तातडीने दुरुस्ती करून वीजपुरवठा पूर्ववत करावा, अशी सूचनाही नाना काटे यांनी केली.

तसेच पिंपळे सौदागर विद्युत विभागाच्या कुणाल आयकॉन येथील ऑफलाइन वीज बिल भरणा केंद्र ते काही कारणास्तव बंद करण्यात झाले आहे. हे केंद्र परिसरातील नागरिकांच्या सोयीसाठी महत्त्वाचे असून, नागरिकांना वीज बिल भरण्यासाठी होणारी गैरसोय लक्षात घेता हे ऑफलाइन वीज बिल भरणा केंद्र तातडीने पुन्हा सुरू करावे, अशी मागणी देखील नाना काटे यांनी केली आहे.



## थोडक्यात पण महत्वाचे



### वन्यप्राण्यांच्या उपद्रवाने शेतकरी दुहेरी संकटात

**नीरा : दैनिक संध्या**

यंदा पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगामातील पिकांची अवस्था बिकट झाली असतानाच पुरंदर तालुक्यातील शेतकऱ्यांसमोर आता वन्यप्राण्यांच्या वाढत्या उपद्रवाचे नवे संकट उभे राहिले आहे. हरणांचे कळप, रानडुक्कर, सायाळ तसेच वानरांकडून भुईमूग, मूग, मका, ऊस, भाजीपाला आणि फळझाडांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडले आहेत. वाल्हे नजीकच्या हनुमान वस्ती परिसरातील शेतकरी दादा हनुमंत पवार यांच्या शेतातील भुईमूग पिकावर वानरांनी ताव मारल्याने मोठे नुकसान झाले आहे. तर पिंगोरी येथील शेतकरी सुनील शिंदे आणि पोपट शिंदे यांच्या ऊस पिकात रानडुकरांनी धुडगूस घालत पिकाची नासाडी केली आहे. तालुक्यातील अन्य गावांमध्येही वन्यप्राण्यांकडून पिकांचे नुकसान होत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहेत. पुरंदर तालुक्यातील अनेक भागांत पिकांची वाढ अपेक्षेप्रमाणे झालेली नसतानाच वन्यप्राण्यांचा उपद्रव सुरू असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. उपलब्ध पाण्यावर पिके वाचविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या शेतकऱ्यांना आता उभ्या पिकांचे वन्यप्राण्यांपासून संरक्षण करण्यासाठीही मोठी कसरत करावी लागत आहे. रात्रीच्या वेळी हरणांचे कळप आणि रानडुक्कर शेतात घुसून उभ्या पिकांची नासधूस करीत आहेत. सायाळांकडूनही पिकांचे नुकसान होत असून, दिवसा वानरांचे कळप शेतात येऊन भुईमूगाच्या शेंगा, भाजीपाला, फळझाडे तसेच अन्य पिकांची तोडफोड करीत आहेत. कसेबसे उभे केलेले आणि हातातोंडाशी आलेले पीक वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे धोक्यात आल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडण्याची भीती निर्माण झाली आहे. गतवर्षी अतिवृष्टीमुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले होते. त्यातून सावरत शेतकऱ्यांनी यंदा कर्ज, उसनवारी आणि उपलब्ध साधनसामग्रीच्या आधारावर पुन्हा खरीप पिकांची लागवड केली. मात्र यंदाही विविध अडचणींचा सामना करावा लागत असताना वन्यप्राण्यांच्या नुकसानीची भर पडल्याने शेतकऱ्यांसमोरील आर्थिक संकट अधिक गंभीर झाले आहे. विशेषतः वानरांचा उपद्रव काही भागांत वाढला असून, शेतातील पिकांसोबतच घरांवरील कौले, पत्रे आणि इतर साहित्याचेही नुकसान होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यामुळे शेतीच्या नुकसानीबरोबरच लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण झाला आहे. "मागील काही दिवसांपासून माकडे घरावरील कौले, पत्रे व इतर साहित्याचे नुकसान करीत आहेत. तसेच शेतातील भाजीपाला, फळझाडे आणि विविध पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. माकडांच्या वाढत्या उपद्रवामुळे लहान मुले, महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. माकडांकडून नागरिकांना इजा होण्याची शक्यता असून भविष्यात कोणतीही दुर्घटना घडण्यापूर्वी वन विभागाने आवश्यक ती कार्यवाही करावी." असे कैलास पवार, शेतकरी, हनुमान वस्ती, वाल्हे यांनी सांगितले. वन्यप्राण्यांचा वाढता उपद्रव रोखण्यासाठी वनविभाग आणि प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. नुकसानग्रस्त पिकांचे प्रत्यक्ष पंचनामे करून योग्य नुकसानभरपाई द्यावी, तसेच वन्यप्राण्यांचा शेतशिवारातील वावर कमी करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशीही मागणी करण्यात येत आहे.

### ‘इमर्जन्सी’ लोडशेडिंगने ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत

**नीरा : दैनिक संध्या**

पुरंदर तालुक्यातील ग्रामीण भागात मागील आठवड्यापासून कृषी पंपांच्या फिडरसाठी सुरू असलेल्या ‘इमर्जन्सी’ लोडशेडिंगचा मोठा फटका वाड्या-वस्त्यांवरील नागरिकांना बसत आहे. वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत झाले असून विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही त्याचा गंभीर परिणाम होत आहे. अनेक वाड्या-वस्त्यांवरील विद्यार्थी रात्री टॉर्चच्या उजेडात अभ्यास करताना दिसत असून, त्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. पुरंदर तालुक्यातील अनेक वाड्या-वस्त्या डोंगराळ तसेच बागायती क्षेत्रात आहेत. या परिसरात मागील काही वर्षांपासून बिबट्याचा वावर वाढला असून, रात्रीच्या वेळी वीजपुरवठा खंडित झाल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अंधाराचा फायदा घेऊन बिबट्याचा वावर वाढण्याची शक्यता असल्याने शेतकरी व शेतमजुरांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. त्यातच सर्पदंशाचा धोका आणि चोरीच्या घटनांमुळे रात्रीच्या वेळी घराबाहेर पडणेही ग्रामस्थांसाठी धोकादायक ठरत आहे. वाल्हे, जेऊर, मांडकी, हरणी, पिंगोरी, पिसुर्टी, सुकलवाडी, वागदरवाडी तसेच नीरा परिसरातील विविध ग्रामपंचायतींच्या हद्दीतील वाड्या-वस्त्यांना कृषी पंपांच्या फिडरवरून वीजपुरवठा केला जातो. त्यामुळे कृषी पंपांसाठी ‘इमर्जन्सी’ लोडशेडिंग करण्यात येत असताना त्याचा परिणाम शेतातील लोकवस्तीवरही होत आहे. रात्रीच्या वेळी घरांमध्ये उजेड नसल्याने वृद्ध, महिला आणि लहान मुलांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. उकाडा आणि डासांचा वाढता प्रादुर्भाव यामुळे नागरिकांच्या आरोग्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. दरम्यान, पावसाने काही दिवसांपासून दडी मारल्याने शेतकऱ्यांसमोर उभी पिके वाचविण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. ऐन पावसाळ्यात उन्हाळ्यासारखे कडक ऊन पडत असल्याने शेतातील पिकांना पाण्याची गरज भासत आहे. मात्र, शेतीपंपांसाठी वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने पिकांना वेळेवर पाणी देता येत नाही. बिबट्याची दहशत असतानाही शेतकरी जीव धोक्यात घालून रात्रीच्या वेळी पिकांना पाणी देण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यातच वीजपुरवठ्याच्या अनिश्चिततेमुळे उभी पिके करपण्याच्या मार्गावर असल्याने शेतकरी वर्गातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी, शेतकरी आणि ग्रामस्थांची गैरसोय लक्षात घेऊन कृषी पंपांच्या फिडरवर लोडशेडिंग करताना गावठाण तसेच वाड्या-वस्त्यांवरील घरगुती वीजपुरवठा खंडित होणार नाही, याची खबरदारी घ्यावी. रात्रीच्या वेळी वीजपुरवठा सुरळीत ठेवून ग्रामीण भागातील नागरिकांची सुरक्षितता आणि विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

### भूमिपुत्र प्रतिष्ठानच्या गौरी-गणपती सजावट स्पर्धेचे उद्घाटन

**शिरूर : दैनिक संध्या**

शिरूर शहर व परिसरातील घरगुती गौरी-गणपती सजावटीला प्रोत्साहन मिळावे आणि गणेशोत्सव अधिक उत्साहपूर्ण व विधायक पद्धतीने साजरा व्हावा, या उद्देशाने भूमिपुत्र प्रतिष्ठानच्या वतीने गेल्या चार वर्षांपासून आयोजित करण्यात येत असलेल्या गौरी-गणपती सजावट स्पर्धेचे यंदाचे औपचारिक उद्घाटन उद्योजक प्रकाश धारीवाल व आदित्य धारीवाल यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी ‘गणराया करंडक २०२६’च्या बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले. भूमिपुत्र प्रतिष्ठानच्या वतीने यंदाही शिरूर शहर व परिसरातील गणेशभक्तांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून, यामध्ये गौराई सजावट, गणपती सजावट तसेच लहान मुलांसाठी ‘सेल्फी विथ बाप्पा’ या स्पर्धेचा समावेश आहे. घरगुती गणेशोत्सवातील आकर्षक सजावट, रोषणाई, पर्यावरणपूरक संकल्पना तसेच सामाजिक संदेश यांना प्रोत्साहन देणे हा या स्पर्धेचा प्रमुख उद्देश आहे. स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना सन्मानचिन्हांसह आकर्षक भेटवस्तू देऊन गौरविण्यात येणार आहे. गेल्या चार वर्षांपासून आयोजित होत असलेल्या या स्पर्धेला शिरूर शहर व परिसरातील गणेशभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. घरगुती सजावट, आकर्षक रोषणाई, पर्यावरणपूरक सजावट आणि सामाजिक संदेश यामुळे ‘गणराया करंडक’ स्पर्धेने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

# चाकणला बालरंगभूमी परिषदेच्या वतीने लोककला प्रशिक्षण दिमाखात संपन्न

■ चाकण (दै. संध्या)

चाकण येथे बालरंगभूमी परिषदेच्या वतीने लोककला प्रशिक्षण दिमाखात संपन्न झाले. जल्लोष लोककलेचा महोत्सवाअंतर्गत जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत लोककला प्रशिक्षणासह प्रबोधन कार्यशाळाही मोठ्या उत्साहात पार पडली.

महाराष्ट्राची कला व परंपरा जपताना बालमनावर संस्कार करून उद्याची कलासक्त व सशक्त पिढी घडवण्याचे कार्य बालरंगभूमी परिषद गेली अनेक वर्षे करत आहे. त्याचाच एक भाग म्हणून या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आल्याचे आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते नारायण करपे व उद्योजक मनोहर शेवकरी यांनी सांगितले. या प्रशिक्षणासाठी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कलाकार, प्रसिद्ध गायक व संबळ वादक वैभव बंडोपंत ढेंबे यांनी मार्गदर्शन केले.

ढेंबे यांनी यावेळी महाराष्ट्राच्या मातीत रुजलेल्या विविध लोककलांचा इतिहास आणि महत्त्व उलगडून सांगितले. देवीची उपासना करणारी आणि रात्री जागून केली जाणारी जागरण ही भक्तीप्रधान कला आहे. संबळ, तुणतुणे या वाद्यांच्या साथीने गोंधळी आपली कला सादर करतात.

संत एकनाथ महाराजांनी जनप्रबोधनासाठी निर्माण केलेला भारुड हा लोकनाट्याचा एक प्रकार आहे. अध्यात्म आणि विनोद यांचा सुंदर संगम भारुडात आहे. महाराष्ट्राची ओळख असलेली लावणी ही श्रृंगार आणि भक्ती यांचा मिलाफ आहे. ढोलकीच्या ठेक्यावर सादर होणारी ही कला आज जगभरात प्रसिद्ध आहे. ग्रामीण भागातील प्रश्न, सामाजिक व्यंग आणि विनोदावर आधारित लोकनाट्य आहे. यातून मनोरंजनातून प्रबोधन केले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचे वर्णन करणारे पोवाडे आणि शेतात, सणावाराला म्हटली जाणारी पारंपारिक लोकगीते यांनी महाराष्ट्राची संस्कृती जिवंत ठेवली आहे. या सर्व कलाप्रकारांचे ढेंबे यांनी विद्यार्थ्यांसमोर सादरीकरण करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. यावेळी बालरंगभूमी परिषद पुणे शाखेचे उपाध्यक्ष नारायण करपे, सहकार्यवाह विजयकुमार तांबे, सदस्य मनोहर बापू शेवकरी, मुख्याध्यापक प्रभाकर शिंदे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## रामवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना इनरव्हिल क्लबकडून स्पोर्ट ड्रेस व खाऊचे वाटप

■ नारायणगाव(दै. संध्या)

जुन्नर तालुक्याच्या पश्चिम भागातील रामवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी इनरव्हिल क्लब नारायणगावच्या वतीने सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. सोमवार, दि. ७ सप्टेंबर रोजी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना स्पोर्ट ड्रेस तसेच खाऊचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमावेळी इनरव्हिल क्लब नारायणगावच्या अध्यक्षा रश्मी थोरवे मॅडम, सचिव प्रिती शहा, खजिनदार ॲड. सुनिता चासकर तसेच चार्टर अध्यक्षा व विभागीय समन्वयक अंजली खैरे उपस्थित होत्या.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याबरोबरच आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अशा सामाजिक उपक्रमांचे महत्त्व मोठे आहे. इनरव्हिल क्लब नारायणगावने विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या या उपक्रमाचे शाळेचे मुख्याध्यापक, शालेय व्यवस्थापन समिती तसेच ग्रामस्थांनी स्वागत करून क्लबच्या अध्यक्षा व सर्व सदस्यांचे आभार मानले.

## मेडीकल व्यवसाय सांभाळत पल्लवी थोरवे यांनी लिहिली तुकाराम गाथा

■ चाकण(दै. संध्या)

वारकरी सांप्रदायाचा वसा आणि वारसा शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागातही मोठ्या दिमाखात जपण्याचे काम आजही सुरू असून येथील एक एकोणचाळीस वर्षीय तरुण विवाहिता पल्लवी प्रमोद थोरवे यांनी मेडिकल व्यवसाय सांभाळत जगदगुरु

संत तुकाराम गाथेचे हस्तलिखित लेखन पूर्ण करून प्रेरणादायी संकल्प यशस्वीरित्या पूर्ण केला आहे. त्यामुळे पल्लवी यांच्यावर चाकण पंचक्रोशीतून कौतुकांचा वर्षाव होत आहे. शेखर महाराज जांभूळकर यांनी सुरू केलेल्या एक लाख गाथा लेखन या उपक्रमातून प्रेरणा घेऊन पल्लवी प्रमोद थोरवे यांनी चाकण येथे आपला मेडीकल व्यवसाय सांभाळत आणि कौटुंबिक जबाबदारी पार पाडत पहाटेच्या पवित्र वातावरणात अवघ्या सहा महिन्यांमध्ये गाथा लेखन पूर्ण केले. पल्लवी यांचे सासरे अर्जून अनंतराव थोरवे यांनी गाथा लेखन करण्यासाठी त्यांना प्रचंड प्रोत्साहन दिले. तुका आकाशाएवढा हे सत्य पल्लवी यांनी आपल्या गाथेतून समाजापुढे मांडले आहे. त्यांचा आदर्श आजच्या युवा पिढीला चालना व प्रेरणा देणारा एक चालता बोलता इतिहास आहे. आवड असेल तर सवड



निश्चित मिळते, हे पल्लवी यांनी आपले मेडिकल सांभाळत गाथा लिखाण करून सर्वांना दाखवून दिले आहे. जो दुसऱ्यांचं भलं इच्छितो, त्यांचं देवही भलं करतो, हे संत वचन पल्लवी यांनी अंगीकारल्याने अल्पावधीत त्यांनी संत तुकाराम गाथेचे लेखन पूर्ण केले. आधी केले मग सांगितले हे ब्रीद त्यांनी सत्यात उतरवून ग्रामीण भागात आपल्या कार्यकर्तुत्वांने समाजात वेगळा ठसा उमटवला आहे. दररोज काहीतरी लिहित जावे. प्रसंगी काहीतरी वाचीत जावे, या उक्ती प्रमाणे ही सेवा पल्लवी थोरवे यांच्या जीवनातील अत्यंत आनंददायी व मनाला समाधान आणि चैतन्य देणारा अविस्मरणीय क्षण ठरला आहे.

## जेजुरी देवस्थानकडून कर्नलवाडी विद्यार्थांना स्कूल बॅगचे वाटप

■ निरा : (दै. संध्या)

श्री मार्तंड देवस्थान जेजुरी यांनी सामाजिक बांधिलकी जपत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध व्हावे तसेच त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने श्री मार्तंड देवस्थान च्या माध्यमातून परिसरातील ब्राम्हणदरा,कोंडेवाडी, झिरीपवस्ती (ता. पुरंदर) येथील प्राथमिक शाळेतील १२० विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप केले.

दरम्यान, जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ.दिगंबर दुर्गाडे, देवस्थानचे विश्वस्त पोपट खोमणे, मंगेश घोणे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना दप्तरांचे वितरण करण्यात आले.

या वेळी कर्नलवाडीच्या सरपंच सुवर्णा महानवर, माजी उपसरपंच नंदकुमार निगडे, किरण गदादे, बाळासाहेब निगडे, उद्योजक संतोष निगडे, ग्रामस्थ उपस्थित होते.



## चाकण बाजारात हिरव्या मिरचीचे भाव तेजीत

■ चाकण(दै. संध्या)

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये कांदा, परवल, लसुण, रताळी व हिरव्या मिरचीचे भाव तेजीत राहिले आहेत. राजकोटच्या भुईमूग शेंगांसह पालेभाज्यांचे भाव गडगडले आहेत. एकूण उलाढाल ५ कोटी ७५ लाख रुपये झाली. चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक १ हजार ८४० क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव १,५०० ते ५,००० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,७१० क्विंटल झाली. बटाट्याला कमाल भाव १,५५० रुपये मिळाला. लसणाची एकूण आवक ४५ क्विंटल झाली. लसणाला कमाल भाव १७ हजार ५०० रुपये मिळाला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३२० क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला १ हजार ५०० रुपयांपासून ते ४ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला. शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे : कांदा



- एकूण आवक - १,८४० क्विंटल. भाव क्रमांक - १. ५,००० रुपये, भाव क्रमांक २. ३,८०० रुपये, भाव क्रमांक ३. १,५०० रू. बटाटा - एकूण आवक - १,७१० क्विंटल. भाव क्रमांक १.१,५५० रुपये, भाव क्रमांक २.१,२५० रुपये, भाव क्रमांक ३.७०० रुपये.

फळभाज्या : फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे - टोमॅटो - ३२७ क्विंटल (८०० ते १,८०० रू.), कोबी - २३५ क्विंटल (७०० ते १,५०० रू.), फ्लॉवर - १९२ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), वांगी - ८८ क्विंटल (१,५०० ते २,२०० रु.), भेंडी - १३८ क्विंटल (१,००० ते २,३०० रु.), दोडका - ७२ क्विंटल (१,५०० ते ४,००० रु.), कारली - ७५ क्विंटल ( २,००० ते २,८०० रु.), दुधीभोपळा - ७५ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), काकडी - ७३ क्विंटल (१,००० ते २,५०० रु.), फरशी - ६२ क्विंटल (२,००० ते ३,५०० रु.), वालवड - ७६ क्विंटल (१,००० ते ३,००० रुपये).

# पर्यावरणपूरक व ध्वनी प्रदूषणमुक्त गणेशोत्सव साजरा करावा : गोरे

■ चाकण (दै. संध्या)

पर्यावरणपूरक व ध्वनी प्रदूषणमुक्त गणेशोत्सव साजरा करण्याची गरज आहे, असे आवाहन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य तथा चाकण नगरपरिषदेचे शिवसेनेचे गटनेते नितीनभाऊ गोरे यांनी येथे केले. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर चाकण पोलीस ठाण्यात आयोजित करण्यात आलेल्या शांतता कमिटीच्या बैठकीत मार्गदर्शन करताना नितीनभाऊ गोरे बोलत होते. नितीनभाऊ गोरे पुढे म्हणाले की," चाकण मध्ये गणेशोत्सवात तरुणी, नागरिक, विशेषतः अबाल वृद्ध व रुग्णांना कोणताही त्रास होणार नाही, याची सर्व मंडळांनी काळजी घेण्याची गरज आहे. लेझर लाईट आणि डीजेमुळे मोठ्या प्रमाणावर ध्वनी व प्रकाश प्रदूषण होते. ज्यामुळे आरोग्यास गंभीर त्रास होऊ शकतो. त्यामुळे याचा वापर टाळून सर्वांनी प्रशासनाच्या नियमांचे पालन करणे अपेक्षित आहे. प्रदूषण मुक्तीवर विशेष भर देताना गोरे यांनी सांगितले की, गणेश मूर्तींचे पावित्र्य जपण्यासाठी व नद्यांचे वाढते प्रदूषण रोखण्यासाठी श्रींची मूर्ती थेट नदीपात्रात विसर्जन न करता, ती मूर्ती शासनामार्फत उभारलेल्या मूर्तीसंकलन केंद्रावर जमा करावी." चाकण पोलीस ठाण्याच्या वतीने या बैठकीमध्ये उत्सवातील वाहतूक नियोजन करण्यात आले आहे. मंडप उभारणी, सुरक्षित वीजपुरवठा आणि विसर्जन मिरवणुकीतील शिस्त व सुव्यवस्था यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी एसीपी योगेश रांजणकर, चाकण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम, वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक दिपक गोसावी, चाकण शहरातील गणेश मंडळांचे पदाधिकारी, ग्रामस्थ, तरुण कार्यकर्ते, पोलीस ठाण्यातील कर्मचारी व सेवक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांनी स्वागत केले.



## थोडक्यात पण महत्वाचे



### फुटबॉल स्पर्धेत दिमाखदार विजेतेपद

**नारायणगाव : दैनिक संध्या**

रेडियन्स इंटरनॅशनल स्कूलच्या १७ वर्षाखालील मुलींच्या फुटबॉल संघाने तालुकास्तरीय फुटबॉल स्पर्धेत अप्रतिम कामगिरीचे प्रदर्शन करत अंतिम सामन्यात तब्बल २-० अशा दणदणीत फरकाने विजय संपादन केला आणि विजेतेपदाला गवसणी घातली. या ऐतिहासिक विजयामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील गौरवशाली परंपरेत आणखी एका मानाच्या तुऱ्याची भर पडली आहे. अंतिम सामन्यात सिया कोकणे आणि सान्वी यांनी सुरेख खेळ करत प्रत्येकी एक गोल झळकावला आणि संघाला विजयाच्या दिशेने अग्रेसर केले. संपूर्ण स्पर्धेदरम्यान मुलींनी उत्कृष्ट संघभावना, अतूट आत्मविश्वास, कठोर शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या विजयी संघात सिया शाहाजी कोकणे, यज्ञा लोहार, हर्षदा गोरखनाथ शिंदे, राजनंदिनी जीवन शिंदे, स्मृती समीर वेठेकर, काव्या मयूर वाघमोडे, दुर्वा दिनेश काजुंकर, साक्षी श्रीकांत गाडगे, स्वरा संतोष गायकवाड, शुभ्रा  कदम, अलिझा मोमीन, नेत्रा स्वप्नील भंडारी, इशिता , दुर्वा , प्रणीती, श्रद्धा, ज्ञानेश्वरी आणि आसिन मालजपते यांचा समावेश होता. या यशामागे क्रीडा शिक्षक गणेश कणसे सर यांची अथक मेहनत, सातत्यपूर्ण सराव आणि सखोल मार्गदर्शन अत्यंत मोलाचे ठरले. तसेच योगेश्वर सर यांनी संघाला योग्य दिशा व प्रोत्साहन देत मुलींच्या आत्मविश्वासात भर घातली. निशा मॅडम यांनीही सातत्याने सहकार्य आणि पाठिंबा देत या यशात मोलाची भूमिका बजावली. मुलींच्या या उल्लेखनीय विजयाबद्दल शाळेच्या संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली आणि प्राचार्या सौ. वर्षा मदभावीकर यांच्या सहकार्याने संपूर्ण शिक्षकवृंदाने विजेत्या संघाचे, खेळाडूंचे तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.जिद्द, मेहनत आणि संघभावनेच्या जोरावर रेडियन्सच्या मुलींनी तालुकास्तरीय विजेतेपदावर आपले नाव कोरले.

### वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**नारायणगाव : दैनिक संध्या**

खामगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये सामाजिक बांधिलकी जपणारा एक कौतुकास्पद उपक्रम नुकताच पार पडला. प्रसिद्ध उद्योजक दत्ता खांडेभराड व रुपालीताई खांडेभराड यांनी आपली कन्या कृष्णांगी हिच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वह्या आणि इतर शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावणे आणि त्यांना प्रगतीसाठी प्रोत्साहन देणे हे होते. वाढदिवसाचा आनंद केवळ कौटुंबिक पातळीवर मर्यादित न ठेवता, तो शालेय विद्यार्थ्यांसोबत साजरा करून खांडेभराड परिवाराने समाजासमोर एक चांगला आदर्श घालून दिला आहे. या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. याप्रसंगी उपस्थित असलेले जनजातीय आयोग, दिल्ली तथा महाराष्ट्र राज्यपाल सदस्य किरण गभाले यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सुप्त गुणांचा गौरव केला. ते म्हणाले, "ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जर योग्य संधी, योग्य वातावरण आणि दर्जेदार मार्गदर्शन मिळाले, तर ते शैक्षणिक क्षेत्रात अत्यंत मोठी आणि उल्लेखनीय कामगिरी करू शकतात." त्यांनी विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वासाला उजाळा दिला. तसेच इस्रोच्या भेटीसाठी निवड झालेला गुणवंत विद्यार्थी शौर्य जितेंद्र नेहरकर हा देखील यावेळी उपस्थित होता. उपस्थित सर्व मान्यवरांनी शौर्यच्या या यशाचे विशेष कौतुक केले व त्याला पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. त्याचे हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमाला परिसरातील अनेक प्रतिष्ठित मान्यवर आणि नागरिक उपस्थित होते. यामध्ये आदर्श शिक्षक बाळासाहेब पारधी, ओम खांडेभराड आणि रवींद्र विरणक  प्रामुख्याने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक तानाजी तळपे व दिलीप लोहकरे यांनी केले.तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप लोहकरे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार राहुल रावते यांनी मानले.



### महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेचे शिरूर नगरपरिषदेसमोर आंदोलन

**शिरूर : दैनिक संध्या**

शिरूर नगरपरिषदेमध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी कामगारांनी महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेचे सभासदत्व स्वीकारल्यानंतर त्यांना कामावर रुजू करून घेण्यास संबंधित कंत्राटदाराकडून जाणीवपूर्वक मज्जाव केला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकाराची तातडीने दखल घेऊन कामगारांना त्यांच्या कायदेशीर हक्कानुसार कामावर रुजू करून घ्यावे, तसेच संबंधित कंत्राटदाराची चौकशी करून दोष आढळल्यास त्याच्यावर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेने शिरूर नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेचे सभासद झालेल्या कंत्राटी कामगारांना दिनांक १२ सप्टेंबर २०२६ पासून कामावर रुजू करून घेण्यास जाणीवपूर्वक मज्जाव अथवा प्रतिबंध केला जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. कामगारांना त्यांच्या कायदेशीर हक्कानुसार संघटना स्थापन करण्याचा, संघटनेचे सभासद होण्याचा तसेच आपल्या न्याय्य मागण्यांसाठी संघटित होण्याचा अधिकार आहे. केवळ संघटनेचे सभासदत्व स्वीकारल्यामुळे कोणत्याही कामगारावर अन्याय अथवा भेदभाव होऊ नये, अशी भूमिका संघटनेने मांडली आहे. या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन संबंधित कंत्राटदारास कामगारांना पूर्ववत कामावर रुजू करून घेण्याचे निर्देश द्यावेत आणि सभासदत्व घेतल्यामुळे कोणत्याही कामगारावर भेदभाव अथवा अन्याय होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच कामगारांना कामावर रुजू करून घेण्यास प्रतिबंध करणाऱ्या कंत्राटदाराची चौकशी करून दोष आढळल्यास त्याच्यावर कायद्यानुसार योग्य ती कारवाई करावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. दरम्यान, कामगारांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेच्या वतीने १२ सप्टेंबरपासून शिरूर नगरपरिषदेच्या प्रवेशद्वारासमोर लोकशाही मार्गाने प्रशासकीय बैठा आंदोलन सुरू करण्यात येत असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. या आंदोलनाची दखल घेऊन नगरपरिषद प्रशासन कामगारांच्या प्रश्नावर कोणती भूमिका घेते, याकडे आता लक्ष लागले आहे.

# धामणीच्या खंडोबा मंदिरात अष्टकोनाकृती दीपमाळ शुभारंभ

■ मंचर (दै. संध्या)

धामणी (तालुका आंबेगाव) येथील श्री कुलस्वामी म्हाळसाकांत देवस्थान मंदिराच्या महाद्वाराच्या समोर लोकसहभागातून नवीन दगडी( २१ फूट उंचीची) दीपमाळ बांधण्याच्या कामाचा शुभारंभ रहाटणी (पिंपरी चिचवड)येथील उद्योजक किरण श्रीकांत खुळे पाटील यांच्या हस्ते शुक्रवारी (११ सप्टेंबर ) करण्यात आला असल्याचे ग्रामस्थांनी व सेवेकरी मंडळीनी सांगितले.  पुरातन खंडोबा मंदिर परिसरात यात्रोत्सवात भाविकांना दिपप्रज्वलन करण्यासाठी नवीन दीपमाळ बांधावी असे ह. भ. प. प्रसाद महाराज अमळनेरकर यांनी ग्रामस्थाना सांगितले होते.खंडोबा मंदिरात नवीन दीपमाळ आकर्षक दगडी अष्टकोनाकृती व २१ फूट उंचीची होणार असल्याचे शिल्पकार श्री. कैलास माने (चाकण) यांनी सांगितले. दीपमाळेचे महत्त्व  दीपमाळ ही प्रामुख्याने कुलदैवत व कुलदेवतेच्या. ग्रामदैवताच्या मंदिराच्या समोर व प्रांगणात आढळणारा एक सुंदर आणि पारंपरिक वास्तुकलेचा स्तभ आहे.

या दीपमाळेला दीपस्तंभ किवा दीपज्योती स्तभ असेही म्हणतात. पूर्वीच्या मराठेशाही कालखंडात पारंपारिक मागणीनुसार अनेक सरदार. राजे व श्रीमंत व्यक्ती आपल्या मनोकामना पूर्ण झाल्यावर नवस फेडण्यासाठी खंडोबा मंदिराजवळ दीपमाळा उभारणी केली जात असत. दीपमाळेचा आकार गोल, षटकोनी. अष्टकोनी असू शकतो. ही दीपमाळ तळाशी रुंद आणि वर जाताना निमुळती होत जाते. दीपमाळेच्या खांबावर दिवे ठेवण्यासाठी लहान कोनाडे(देवळ्या) किवा बाहेरील बाजूस तुळ्या(शाखा ) केलेल्या असतात. सर्वात वरती एक मोठा खोलगट दिवा असतो. या कोनाड्यामध्ये किवा तुळ्यावर तेलाचे दिवे लावले जातात. वरच्या भागात कापूर व गुग्गुळ सारखे ज्वालाग्राही तुकडा ठेवून ते पेटवले जाते. ज्यामुळे उंचावरून दीपमाळेचा उजेड मंदिर परिसरात दूरवर पसरतो. जेजुरी गड आणि मंदिर परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी ३५० पेक्षा जास्त लहान-मोठ्या दगडी नवसाच्या दीपमाळा आहेत दिवाळी. देवदिपावली. त्रिपुरा पौर्णिमा. चंपाषष्ठी. सोमवती. यात्रोत्सवात सगळ्या दीपमाळा श्रध्देने प्रज्वलीत केल्या जातात.दीपमाळ ही केवळ प्रकाशाचे साधन नसून ती गावाच्या आणि देवस्थानाच्या वैभवाचे प्रतिक मानले जाते असे संत साहित्याचे अभ्यासक श्री सुरेश भावे (पुणे)यांनी सांगितले.




## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दणक्यानंतर पिंपरी-चिंचवड महापालिकेचा बांधकाम विभाग हादरला!

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या बांधकाम परवानगी विभागात सुरू असलेल्या गंभीर आर्थिक गैरव्यवहार आणि मनमानी कारभाराची राज्य सरकारने अत्यंत गंभीर दखल घेतली आहे. माजी उपमहापौर तथा नगरसेवक तुषार हिंगे यांनी केलेल्या पुराव्यानिशी तक्रारीवर थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कठोर पावले उचलत सह शहर अभियंता सुनील भागवाणी आणि कार्यकारी अभियंता विजय सोनवणे यांच्याविरोधात उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत. मुख्यमंत्र्यांच्या या धडक निर्देशानंतर राज्यभरात खळबळ उडाली असून, या उच्चस्तरीय आदेशाचा धाक निर्माण होतच पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासन तात्काळ हादरले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या चौकशीच्या निर्देशानंतर प्रशासकीय यंत्रणेला तात्काळ जाग आली असून, महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. विजय सूर्यवंशी यांनी तात्काळ कारवाईचा बडगा उगारला आहे. पुनावळे परिसरातील एका वादग्रस्त इमारतीच्या अग्निशामक शुल्कात (प्रशमन शुल्क) झालेला मोठा घोळ आणि अफरातफर प्रकरणी महापालिकेने कार्यकारी अभियंता विजय पुंडलिक सोनवणे आणि उप अभियंता अशोक श्रावण मोरे यांना तडकाफडकी निलंबित केले आहे. मुख्यमंत्र्यांच्या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करत प्रशासनाने घेतलेल्या या तात्काळ भूमिकेमुळे महापालिका वर्तुळात अभूतपूर्व कंप सुटला आहे.

माजी उपमहापौर तुषार हिंगे यांनी मुख्यमंत्र्यांकडे सादर केलेल्या तक्रारीत पर्दाफाश केला होता की, बांधकाम विभागातील अधिकारी एकाच पदावर दीर्घकाळ टिकून राहून भ्रष्टाचाराचे अभेद्य जाळे चालवत आहेत. मंजुरीसाठी येणाऱ्या फायलींमध्ये जाणीवपूर्वक तांत्रिक अडचणी, उणिवा व त्रुटी निर्माण करून प्रति चौरस फूट ५ ते ६ रुपयांची वसुली केली जात आहे. जोपर्यंत ही लाचखोरीची मागणी पूर्ण होत नाही, तोपर्यंत एकही फाईल पुढे सरकत नाही आणि मंजुरी प्रक्रिया विनाकारण रेंगाळली जाते, असा गंभीर आरोप त्यांनी केला होता. या तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेऊन खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने चौकशीचे आदेश पारित केले. या राज्यस्तरीय हस्तक्षेपानंतर प्रशासन तातडीने कामाला लागले असून, प्रशमन शुल्कात 'प्रपत्र अ' आणि 'प्रपत्र ब' अंतर्गत तफावत निर्माण करून समर्पक खुलासा न करणाऱ्या कार्यकारी अभियंता विजय सोनवणे आणि उपअभियंता अशोक मोरे यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा नियमांनुसार निलंबनाची कुऱ्हाड वळविण्यात आली आहे. तसेच त्यांच्यावर विभागीय चौकशी सुरू करण्याचे निर्देश देत निलंबन काळात त्यांना मुख्यालय सोडण्यास सक्त प्रतिबंध करण्यात आला आहे. मुख्यमंत्र्यांच्या या कठोर भूमिकेमुळे आणि माजी उपमहापौर तुषार हिंगे यांच्या आक्रमक लढ्यामुळे भ्रष्ट अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले असून, बांधकाम विभागातील मनमानी आणि लाचखोरीच्या कारभाराला मोठा आळा बसण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

## 'प्रकाशगाथा, महावितरणच्या मानव संसाधनाची' पुस्तकाचे प्रकाशन

■ बारामती : (दै. संध्या)

महावितरणच्या मानव संसाधन विभागाने गेल्या सव्वा वर्षात राबवलेले विविध नाविन्यपूर्ण उपक्रम, धोरणात्मक निर्णय आणि कर्मचारी कल्याणाच्या योजनांचा लेखाजोखा मांडणाऱ्या 'प्रकाशगाथा, महावितरणच्या मानव संसाधनाची' या पुस्तकाचे प्रकाशन ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला आणि मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्याहस्ते शुक्रवारी (दि. ११) झाले.

महावितरणच्या 'प्रकाशगड' मुख्यालयात आयोजित कार्यक्रमाला संचालक श्री. अनुदीप दिघे (वित्त), श्री. धनंजय औंढेकर (संचालन), श्री. योगेश गडकरी (वाणिज्य), श्री. सचिन तालेवार (प्रकल्प), श्री. राजेंद्र पवार (मानव संसाधन), कार्यकारी संचालक श्री. परेश भागवत (मानव संसाधन), मुख्य महाव्यवस्थापक श्री. भूषण कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस, ऊर्जा राज्यमंत्री मा. मेघना साकोरे-बोर्डीकर, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) मा. आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र, स्वतंत्र संचालक मा. विश्वास पाठक यांनी या पुस्तकाच्या शुभेच्छा संदेशामध्ये मानव संसाधन विभाग आणि अधिकारी, अभियंते व कर्मचाऱ्यांच्या विविध उल्लेखनीय कामांचा गौरव केला आहे. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या मार्गदर्शनात संचालक श्री. राजेंद्र पवार यांनी मानव संसाधन विभागाला गेल्या सव्वा वर्षांच्या कार्यकाळात विविध कल्याणकारी निर्णय आणि उपक्रमांच्या माध्यमातून लोकाभिमुख व कर्मचारीभिमुख चेहरा मिळवून दिला आहे. शून्य विद्युत अपघातासाठी विविध उपाययोजना, विश्वविक्रमी विद्युत सुरक्षा जनजागृती अभियान, महिला कर्मचारी सक्षमीकरण व सन्मान, अभियंते व जनमित्रांचा सन्मान, कर्मचारी संघटनांशी मासिक संवाद, कौटुंबिक स्नेहमेळावे, विविध कल्याणकारी योजनांच्या आर्थिक तरतूदीत वाढ आणि या सर्वांची अंमलबजावणी यावर हे पुस्तक आधारित आहे.

## मुकुंदराज बाबा कपाटे यांची मानवाधिकार संरक्षण संघटनेच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षपदी नियुक्ती

■ कोरेगावमुळ : (दै. संध्या)

मानवाधिकार संरक्षण, सामाजिक न्याय तसेच वंचित व दुर्बल घटकांच्या हक्कांसाठी कार्यरत असलेल्या ह्युमन राईट्स असोसिएशन फॉर प्रोटेक्शन या संघटनेच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षपदी प.पू.प. महंत मुकुंदराज बाबा कपाटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे राष्ट्रीय सचिव प्रमोद केसरकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती करण्यात आली.

नियुक्तीनिमित्त मुकुंदराज बाबा कपाटे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून त्यांना पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी मुळशी तालुका अध्यक्ष विशाल भानुसे, मावळ तालुका अध्यक्ष कांतीलाल सोरटे, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष लक्ष्मण दवणे, तसेच जय हिंद सुतार, सचिन केदारी यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. मुकुंदराज बाबा कपाटे यांच्या सामाजिक, आध्यात्मिक व मानवतावादी कार्याचा अनुभव संघटनेच्या



मानवाधिकारविषयक उपक्रमांना निश्चितच बळ देईल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. नवनियुक्त महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष मुकुंदराज बाबा कपाटे म्हणाले, 'संघटनेने माझ्यावर सोपविलेली ही जबाबदारी माझ्यासाठी सन्मानाची तसेच सामाजिक बांधिलकीची आहे. समाजातील दुर्बल, वंचित व गरजू घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि त्यांच्या हक्कांसाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचा माझा प्रयत्न राहील.

'मानवाधिकार संरक्षण हेच आमचे ध्येय' हा विचार केंद्रस्थानी ठेवून संघटनेच्या माध्यमातून अधिक व्यापक स्वरूपात सामाजिक कार्य करण्यासाठी मी कटिबद्ध आहे'.

## राहुल कुल यांच्या नेतृत्वाखाली प्रकल्पांची पाहणी

■ यवत (दै. संध्या)

महाराष्ट्र विधानमंडळाच्या सार्वजनिक उपक्रम समितीचे अध्यक्ष तथा दौंडचे आमदार ॲड. राहुल कुल यांच्या नेतृत्वाखाली समितीने गडचिरोली, चंद्रपूर आणि नागपूर जिल्ह्यांचा अभ्यास दौरा करून विविध औद्योगिक, वन, पायाभूत सुविधा, सिंचन तसेच शासकीय महामंडळांच्या प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी केली. स्थानिकांना रोजगाराच्या संधी, पारदर्शक प्रशासन आणि विकासकामांना गती देण्यावर या दौऱ्यात विशेष भर देण्यात आला. गडचिरोली जिल्ह्यातील कोणसारी येथील लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडच्या डायरेक्ट रिड्यूस्ड आयर्न व पेलेट प्रकल्पाची तसेच सूरजागड येथील लोहखनिज खाण प्रकल्पाची समितीने पाहणी केली. औद्योगिकीकरणामुळे स्थानिक आदिवासी तसेच सुशिक्षित तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असून, स्थानिक भूमिपुत्रांना रोजगारात प्राधान्य देण्याचे निर्देश ॲड. राहुल कुल यांनी संबंधित व्यवस्थापनाला दिले.

हेड्री येथील लॉयड्स कलियाम्मल मेमोरियल हॉस्पिटलमधील एमआरआय,



सिटी स्कॅन, एनआयसीयू व पीआयसीयू यांसारख्या आरोग्य सुविधांचीही समितीने पाहणी केली. तसेच स्थानिक शाळा, 'एलटी गोंडवाना' उपजीविका प्रकल्प आणि 'वन्या गारमेंट्स' या महिला कपडे निर्मिती केंद्राला भेट देऊन CSR निधीतून सुरू असलेल्या उपक्रमांचा आढावा घेण्यात आला.

चंद्रपूर जिल्ह्यात बल्लारशाह येथील शासकीय लाकूड डेपोला भेट देऊन तेथील कामकाजाची पाहणी करण्यात आली. नवीन संसद भवन आणि अयोध्येतील श्री राम मंदिरासाठी या डेपोतून सागवान लाकडाचा पुरवठा करण्यात आल्याची माहिती समितीने घेतली. त्यानंतर चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनीतील बैठकीत GIS, GPS, ड्रोन व रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानाचा वनसंरक्षणासाठी होणारा वापर तसेच मानव-वन्यजीव संघर्ष निवारण प्रशिक्षणाचा आढावा घेण्यात आला. स्थानिक युवकांसाठी सुरू असलेल्या ऑटोमोबाईल, हॉस्पिटॅलिटी, टूर गाईड आणि JCB ड्रायव्हिंग प्रशिक्षणाचे समितीने कौतुक केले. नागपूर दौऱ्यात मिहान प्रकल्प व डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसराची पाहणी करण्यात आली. मिहानमध्ये झालेली गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि विविध उद्योगांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला.

# शिक्षकांच्या ज्ञानातून समाजपरिवर्तनाची नवी दिशा

■ शिरूर (दै. संध्या)

समाजात विधायक परिवर्तन घडवून आणण्यात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, ज्ञानदानाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, शिस्त आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे कार्य शिक्षक करीत असतात. शिक्षकांच्या कार्याचा समाजाने गौरव करणे ही कौतुकास्पद बाब आहे, असे प्रतिपादन राष्ट्रपती शिक्षक पुरस्काराने सन्मानित आदर्श शिक्षक हरिभाऊ नाथू पानसरे यांनी केले.

श्रीमंत हलवाई चौक गणेश मित्र मंडळाच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात हरिभाऊ पानसरे, साधना संजय शितोळे, संजय पंढरीनाथ वेदपाठक आणि जयश्री ज्ञानेश्वर दांडगे यांना 'प्रेरणादायी शिक्षक' पुरस्काराने गौरविण्यात आले. नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजित पाचर्णे आणि शिरूर शिक्षण प्रसारक मंडळाचे माजी अध्यक्ष सुकुमार बोरा यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना हरिभाऊ पानसरे म्हणाले की, जीवनात यश मिळविण्यासाठी कष्ट, अभ्यास आणि सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक आहेत. विद्यार्थ्यांनी शिस्तीचे पालन करावे, नियमित व्यायामाची सवय लावून घ्यावी आणि आळसापासून दूर राहावे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण व संस्कारांची दिशा देतानाच शिष्यवृत्ती, मुलींच्या शिक्षणासाठी जनजागृती, शाळा उभारणी आणि विविध सामाजिक उपक्रमांमध्ये दिलेल्या योगदानाबद्दल पानसरे यांचा विशेष गौरव करण्यात आला. साधना शितोळे यांनी शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन असून, शिक्षक हा विद्यार्थ्यांसाठी केवळ ज्ञान देणारा नव्हे तर आदर्श व्यक्तिमत्त्व घडविणारा मार्गदर्शक असतो, असे सांगितले. संजय वेदपाठक यांनी विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर माफक प्रमाणात करावा



आणि बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्तेचा योग्य व प्रभावी वापर करावा, असे आवाहन केले. संगणक शिक्षण क्षेत्रात ३५ वर्षांहून अधिक काळ कार्यरत असलेल्या वेदपाठक यांच्या मार्गदर्शनाखाली हजारो विद्यार्थ्यांनी संगणक शिक्षण घेतले आहे. सुकुमार बोरा म्हणाले की, ज्ञानदान केल्याने ज्ञान वाढते. शिक्षकांनी सतत कार्यमग्न, कर्तव्यदक्ष, शिस्तबद्ध आणि क्षमाशील राहून विद्यार्थ्यांमध्ये सद्गुणांची पेरणी करावी. परिवर्तनवादी शिक्षणातून विद्यार्थ्यांना जीवनाची योग्य दिशा मिळते. हलवाई चौक गणेश मंडळाने शिक्षक दिनानिमित्त सुरू केलेला 'प्रेरणादायी शिक्षक' पुरस्काराचा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे.

# आदर्श शिक्षकांचा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते सन्मान

## शाळांचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी व विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरचे शिक्षण देण्यासाठी सर्वतोपरी मदत – उपमुख्यमंत्री

■ बारामती (दै. संध्या)

शिक्षण हे सर्वात मोठे शस्त्र असून शिक्षक ही राष्ट्राची खरी संपत्ती आहे. बारामती शहर नेहमीच शैक्षणिक व सामाजिक प्रगतीचे केंद्र राहिले आहे. बारामती तालुक्यातील शाळांचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी व विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरचे शिक्षण देण्यासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिली.

पंचायत समितीच्यावतीने आयोजित आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळ्यात त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे,उपसभापती विवेक वळसे पाटील, पंचायत समिती सभापती किरण तावरे, उपसभापती शुभांगी आगवणे, नगराध्यक्ष सचिन सातव, उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे,गट विकास अधीकारी किशोर माने,तहसीलदार स्वप्नील रावडे,आरोग्य अधिकारी मनोज खोमणे उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, विद्यार्थ्यांना योग्य दिशा देण्याची महत्त्वाची जबाबदारी शिक्षकांवर आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकातील ज्ञान न देता त्यांच्यामध्ये सत्यनिष्ठा, देशप्रेम आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवावा. पुणे जिल्हा ही शिक्षणाची पंढरी आहे. या समृद्ध शैक्षणिक परंपरेत शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षक हे समाज आणि राष्ट्राचे खरे शिल्पकार असून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करण्याचे कार्य ते करतात.

बारामती तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान उल्लेखनीय आहे. या शाळांमध्ये शिक्षण घेणारी मुले ही ग्रामीण महाराष्ट्राची खरी ताकद असून त्यांच्या गुणवत्ता आणि क्षमतेला योग्य दिशा देण्याचे काम शिक्षकांनी करावे. महाराष्ट्र ही संत, समाजसुधारक आणि शिक्षणतज्ज्ञांची भूमी आहे. राज्यातील अनेक शिक्षकांनी आपल्या कार्यातून राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर लौकिक मिळवला आहे, असेही त्यांनी सांगितले.

त्या म्हणाल्या, राज्य शासनाने शिक्षण आणि शिक्षण क्षेत्राच्या विकासाला नेहमीच अग्रक्रम दिला आहे. बदलत्या काळानुरूप शिक्षकांनी अद्ययावत तंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षणासोबतच समस्या निराकरण, टीमवर्क आणि मूल्याधारित शिक्षणाची जोड देत त्यांच्यामध्ये सद्गुणांची रुजवणूक करावी. स्पर्धेच्या युगात आत्मविश्वासाने परिस्थितीला सामोरे जाणारी सशक्त पिढी घडविण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे.

ग्रामीण भागातील एकही मूल शिक्षणापासून वंचित राहणार नाही व जिल्हा परिषद शाळेचा दर्जा सुधारण्यासाठी राज्य शासन सातत्यपूर्ण प्रयत्न करत आहे. विद्यार्थ्यांनी वाचन करावे, विचार करावा, प्रश्न विचारावेत, स्वतःचे मत तयार करावे आणि अपयशाची भीती बाळगू नये, असा सल्लाही उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी दिला.

शिक्षणामुळे सामान्य माणसाच्या जीवनात सकारात्मक बदल घडतो. स्व. अजितदादांनी नेहमीच महाराष्ट्राच्या तसेच पुणे जिल्ह्याच्या शैक्षणिक विकासाला प्राधान्य दिले. प्रत्येक जिल्हा परिषद शाळेत अद्ययावत संगणक कक्ष, ई-लर्निंग सुविधा आणि डिजिटल वर्गखोल्या उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षकांना आधुनिक अध्यापन पद्धतींचे प्रशिक्षण देण्यासाठी विशेष निधीची तरतूद करण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले.



राज्याच्या शिक्षण क्षेत्रात सकारात्मक आणि गुणात्मक बदल घडविण्याचा शासनाचा निर्धार असून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी मुख्यमंत्री विज्ञानवारी, गुणवंत विद्यार्थ्यांसाठी सायन्स सेंटर, समूह शाळा, आदर्श शाळा, दत्तक शाळा, प्रवेशोत्सव, आरोग्य तपासणी, सैनिकी शिक्षण, मोफत गणवेश, निपुण महाराष्ट्र अभियान यांसारखे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. शिक्षकांचे प्रश्न, शाळांमधील सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी शासन सदैव तत्पर आहे असे सांगून यावर्षी पुणे जिल्हा परिषदेच्या ६०० शाळा मॉडेल स्कूल करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे म्हणाले, शिक्षक आणि विद्यार्थ्यांची गुणवत्ता वृद्धिंगत व्हावी, ही जिल्हा परिषदेची भूमिका आहे. जिल्हा परिषदेतमार्फत देण्यात येणाऱ्या योजनांच्या लाभापासून ग्रामीण भागातील एकही विद्यार्थी, शिक्षक,पालक वंचित राहणार नाही.

विद्यार्थी, शिक्षक, लोकप्रतिनिधी यांचा संवाद असणे अतिशय गरजेचे आहे. कै अजितदादा यांच्या संकल्पनेतून मॉडेल स्कूल निर्मिती करण्याचा संकल्प तसेच ग्लोबल गुरुजी सारखे विविध उपक्रम जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत आहेत. नासा, इस्रोमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सुद्धा वाढली आहे.

श्री. तावरे म्हणाले, तालुक्यातील अंगणवाड्या जिल्हा परिषद शाळांमध्ये सोलर बसविण्यात येणार आहेत. आरटीई अंतर्गत पूर्ण पारदर्शकपणे विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. इयत्ता पाचवी ते दहावी मध्ये शिकणाऱ्या मुलींसाठी आरोग्य तपासणी कार्यक्रम राबविण्यात येत आहे. स्पर्धा परीक्षेची पहिली परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या परीक्षेसाठी पंचायत समितीकडून निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे असे सांगून तालुक्यातील शाळांना संगणक लॅब व आधुनिक प्रयोगशाळा सुरू करण्यासाठी सहकार्य करावे.

गटविकास अधिकारी श्री माने यांनी प्रास्ताविकात जिल्हा परिषद शाळांच्या प्रगतीचा आढावा घेतला. बारामती तालुक्यात ६५ जिल्हा परिषद शाळांमध्ये ११ हजार पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत असल्याचे सांगून तालुक्यातील आरटीई अंतर्गत शिक्षण घेत असलेले विद्यार्थी, मागील व चालू वर्षातील मॉडेल स्कूलच्या कामांची प्रगती, शिक्षक भरती, मिशन ३०० अंतर्गत शाळांमध्ये करण्यात येणाऱ्या कामांची माहिती दिली. कार्यक्रमाला जिल्हा परिषद,पंचायत समिती सदस्य, आजी- माजी लोकप्रतिनिधी, आदर्श शिक्षक, गुणवंत विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### चाकणला यंदा गाजणार 'खंडोबा बानूबाई विवाह सोहळा' जिवंत देखावा

चाकण : दैनिक संध्या

सार्वजनिक गणेश उत्सव मंडळांकडून देखाव्यांची जोरदार तयारी सुरू असून, चाकणला यंदा शंभर वर्षे पूर्ण करणाऱ्या श्री समस्त बालवीर मंडळाचा यंदाचा 'खंडोबा बानूबाई विवाह सोहळा' हा जिवंत देखावा प्रचंड गाजणार आहे. गणेश आगमनाच्या पार्श्वभूमीवर चाकण येथे या मंडळाच्या वतीने शहरातून जोरदार मिरवणूक काढण्यात आली होती, अशी माहिती जनता शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष व मंडळाचे अध्यक्ष प्रा. संजय वाडेकर यांनी दिली. विषाचा घास अर्थात तुकाराम मुंढेचा फास, आमचं काय चुकलं, एकटा पडलेला बाप, मी कामाचाच माणूस अजित पवार या जिवंत देखाव्यांचीही यंदा मोठ्या प्रमाणात रेलचेल राहणार आहे. श्री समस्त बालवीर मंडळ यंदा ३५ कलाकारांच्या संचात हा विवाह सोहळा सादर करण्याचा प्रयत्न करणार आहे. संजय वाडेकर यांनी सांगितले की, श्री समस्त बालवीर मंडळाने साधारणपणे सण १९८७ मंदिरातील कायमस्वरूपी मूर्तीची प्रतिकृती ६ उंचीची फायबर मूर्ती उत्सवासाठी बनवली. ही ६ फूट उंचीची फायबर मूर्ती गणेश उत्सवाच्या काळामध्ये मिरवणुकीत व मंडपात बसविले जाते. गणेश मंदिरात गणरायाची पूजा पाठ वसंतराव गाडे व गणेश गाडे हे करत आहे. समस्त बालवीर मंडळ दरवर्षी रक्तदान शिबिर, नेत्र चिकित्सा, आरोग्य तपासणी शिबिर, अन्नदान, वस्तू वाटप असे सामाजिक उपक्रम राबवत असते. श्री समस्त बालवीर मंडळाने संत तुकाराम महाराज यांच्या जीवनावरील नाटक सादर करून पंचक्रोशीत नाव मिळवले आहे. गणेशोत्सव काळात भारुड, मराठी व हिंदी चित्रपट सादर केले आहेत. समस्त बालवीर मंडळ प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही पहिल्या दिवसापासूनच देखावा दाखवण्यास सुरुवात करणार असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष संजय वाडेकर यांनी दिली.

### सोनवळे आश्रम शाळेत 'कळी उमलताना' उपक्रम उत्साहात संपन्न

जुन्नर : दैनिक संध्या

सोनवळे (ता. जुन्नर): एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प घोडेगाव आणि डिसेंट फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा सोनवळे येथे किशोरवयीन मुली वैयक्तिक स्वच्छता व जनजागृती अभियान अंतर्गत मुलींसाठी 'कळी उमलताना' या मानसिक व शारीरिक आरोग्य,व्यक्तिमत्त्व विकास या मार्गदर्शन उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात डिसेंट फाउंडेशनचे सचिव डॉ. एफ. बी. आतार यांनी मुलींना मानसिक आरोग्य व अस्वस्थ करणारे किशोरवय या बाबत मार्गदर्शन केले. सुदृढ आरोग्य, संस्कार, आई- बाबांचा त्याग,आणि आत्मविश्वासपूर्ण व्यक्तिमत्त्व हीच उज्ज्वल भविष्याची गुरुकिल्ली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तर सौ. उज्वला गवळी व सौ शितल पवार यांनी मुलींचे शारीरिक आरोग्य, मासिक पाळीदरम्यान घ्यायची वैयक्तिक स्वच्छता, आहार, व्यायाम ही नैसर्गिक देणगी आहे म्हणून या काळात विशेष काळजी घ्या. तसेच स्वसंरक्षणाचे महत्त्व या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. या प्रसंगी उपस्थित सर्व विद्यार्थिनींना मोफत पर्यावरणपूरक सॅनिटरी नॅपकिन तसेच 'कळी उमलताना' या मार्गदर्शन पुस्तिकेचे वाटप करण्यात आले.या मार्गदर्शनाचा इयत्ता सहावी ते बारावी तील जवळपास 70 मुलींनी सहभाग नोंदवला. या कार्यक्रमास सौ.छाया पाटील, प्रभारी मुख्याध्यापिका मंगल गुंड, अधिक्षिका अंकिता राजपूत, समन्वयक योगेश वाकचौरे, श्रावण घोगरे यांच्यासह आश्रम शाळेतील शिक्षिका व मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या. 'सशक्त मुलगी – सुदृढ समाजाची पायाभरणी' हा संदेश देणरा हा उपक्रम मुलींसाठी अत्यंत उपयुक्त ठरला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी मुख्याध्यापिका सौ मंगल गुंड यांनी तर सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षिका एस.एस. पवार यांनी केले. तर अधीक्षिका अंकिता राजपूत यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रम अत्यंत उत्साहात संपन्न झाला.



# तालुका फोटोग्राफर असोसिएशनच्या सर्व फोटोग्राफर यांच्या माध्यमातून मेळावा संपन्न

■ बारामती (दै. संध्या)

फोटोग्राफी व्यवसायात अत्याधुनिक तंत्रज्ञान चा वापर होत असताना फोटोग्राफर व्यवसायाचा चा विकास व हित जोपासले जावे या उद्देशाने बारामती तालुक्यातील सर्व फोटोग्राफर यांना एकाच छताखाली आणून त्यांच्या समस्या, व्यवसायातील अडचणी व त्यावर मार्गदर्शन करण्यासाठी बारामती तालुका फोटो ग्राफर असोसिएशन च्या वतीने शुक्रवार दि.११ सप्टेंबर रोजी भव्य मेळावा आयोजित करण्यात आला होता.

या प्रसंगी ऍड भार्गव पाटसकर,टॅक्स कन्सल्टंट नितीन डोईफोडे, स्टार हेल्थ कंपनीचे वरिष्ठ अधिकारी योगेश पुरोहित,दौंड फोटोग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष सचिन गायकवाड व बारामती तालुका फोटोग्राफर असोसिएशनचे सर्व आजी, माजी पदाधिकारी, ज्येष्ठ फोटोग्रापर व युवा फोटोग्राफर उपस्तीत होते. व्यवसाय करताना कायदेशीर बाबीचा चा आधार घेतल्यास अडचणी चा सामना करणे सोपे होत असल्याचे मत अ‍ॅड.भार्गव पासटकर यांनी सांगितले.

व्यवसाय छोटा अथवा मोठा असो प्रत्येक फोटोग्राफर आय टी रिटन भरल्यास व्यवसाय वाढविण्यासाठी बँकांमधून कर्ज मिळणे सोपे होईल व व्यवसाय गतिमान होण्यासाठी मदत होणार असल्याचे टॅक्स कन्सल्टंट नितीन डोईफोडे यांनी सांगितले

व्यवसाय करताना वेळी,अवेळी जेवण, प्रवास आदी बाबी होतात त्यामुळे शारीरिक तक्रारी होतात म्हणून स्वतःचा व कुटीबीयांचा आरोग्य विमा असल्यास आर्थिक ताण येणार नाही म्हणून आरोग्य विमा गरजेचा असल्याचे आरोग्य विमा अधिकारी योगेश पुरोहित यांनी सांगितले.



व्यवसायिक स्पर्धा टाळून फोटोग्राफर चे उत्पन्न वाढले पाहिजे या साठी प्रयत्न झाले पाहिजे, एका बॅनर खाली सर्वांनी आले पाहिजे, एकमेकांच्या सुख दुःखात सहभागी झाले ही काळाची गरज असल्याचे दौंड फोटोग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष सचिन गायकवाड यांनी सांगितले.

या प्रसंगी फोटोग्राफी क्षेत्रात योगदान देणाऱ्या ज्येष्ठ फोटोग्राफर यांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी युवा फोटोग्राफर यांनी पुढाकार घेऊन विविध मान्यवरांचे मार्गदर्शन, सभासद नोंदणी, शासनाच्या विविध कर्ज योजना आदी बाबत उपस्थितांना माहिती उपलब्ध करून दिल्याबद्दल उपस्थित फोटोग्राफर यांनी समाधान व्यक्त केले. स्वर्गीय अजितदादा पवार यांना श्रद्धांजली व मान्यवरांच्या हस्ते कॅमेरा पूजन करून शुभारंभ करण्यात आला. स्वागत व सूत्रसंचालन सावळेपाटील यांनी केले.



# गणेशोत्सव २०२६ अनुषंगाने सुपा पोलीस स्टेशन हद्दीत रूट मार्च

■ सुपा (दै. संध्या)

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच पोलीस दलाची आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याची सज्जता तपासण्याच्या उद्देशाने सुपा पोलीस स्टेशनच्या वतीने दि. शनिवारी सकाळी १०:३० ते ११:३० या वेळेत मौजे मोरगाव व मौजे सुपा येथे रूट मार्च आयोजित करण्यात आला.

मौजे मोरगाव येथे मोरगाव मुख्य चौक – कोहिनूर हॉटेल – ग्रामपंचायत मोरगाव – बाजारतळ या मार्गावर रूट मार्च घेण्यात आला. तसेच मौजे सुपा येथे सासवड चौक, सुपा – साठेनगर – शहाजीराजे ग्राउंड – PDDC बँक – ग्रामपंचायत – मुख्य बाजारपेठ – एस.टी. स्टँड या मार्गावर रूट मार्च करण्यात आला. आगामी गणेशोत्सव कालावधीत नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे,पोलीस दलाची दृश्यमान उपस्थिती वाढविणे, संभाव्य अनुचित प्रकारांना प्रतिबंध करणे तसेच कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ व प्रभावीपणे प्रतिसाद देण्यासाठी पोलीस यंत्रणेची सज्जता तपासणे हा रूट मार्चचा प्रमुख उद्देश होता. सदर रूट मार्चमध्ये सुपा पोलीस स्टेशनचे ०३ अधिकारी व २८ पोलीस अंमलदार तसेच बारामती उपविभागातील ०१ RCB प्लाटून सहभागी झाले होते.

# पाटस येथे दोन दुचाकींची समोरासमोर धडक; २५ वर्षीय तरुणाचा मृत्यू

■ पाटस-दौंड (दै. संध्या)

वर्धविनायक मार्गावर दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात पाटस येथील २५ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात दुसऱ्या दुचाकीवरील व्यक्ती गंभीर जखमी झाली असून त्यांच्यावर दौंड येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

शुक्रवारी, दि. ११ रोजी रात्री सव्वादहा वाजण्याच्या सुमारास जुन्या इरिकेशन कॉलनीजवळील धोकादायक वळणावर हा अपघात झाला. शुभम मीनानाथ शितोळे (वय २५, रा. देशमुखवस्ती, पाटस, ता. दौंड) असे मृत तरुणाचे नाव आहे. तर गजानन आत्माराम इंगळे (रा. पारखी, ता. मुक्ताईनगर, जि. जळगाव) हे या अपघातात गंभीर जखमी झाले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गजानन इंगळे हे होंडा शाइन दुचाकीवरून (क्र. एम एच ३० एएस १११४) भरधाव वेगाने पाटसच्या दिशेने येत होते. जुन्या दौंड-पाटस रस्त्यावरील वळणावर त्यांच्या दुचाकीवरील नियंत्रण सुटले. त्याचवेळी शुभम शितोळे हे बजाज प्लॅटिना दुचाकीवरून (क्र. एमएच ४२ बीई ५६९५) पाटसहून दौंडच्या दिशेने जात होते.

यावेळी दोन्ही दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात शुभम शितोळे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला. त्यांना तातडीने पाटस येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी करून उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले.

अपघातामुळे पाटस परिसरात नागरिक हळहळ व्यक्त होत असून, या धोकादायक वळणावर सुरक्षिततेच्या उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधीर कदम व त्यांचे सहकारी करत आहेत.

# समर्थ गुरुकुलमध्ये विद्यार्थ्यांनी बनविल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती

## शाडू मातीपासून मूर्ती निर्मिती; सुमारे ३०० विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

■ जुन्नर (दै. संध्या)

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ गुरुकुल, बेल्हे येथे इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात सुमारे ३०० विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कलाकौशल्यातून सुंदर व आकर्षक गणेशमूर्ती साकारल्या.

विद्यार्थ्यांनी शाडू मातीचा वापर करून विविध आकारांच्या व आकर्षक स्वरूपातील गणेशमूर्ती तयार केल्या. मूर्ती निर्मितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ कलात्मक अभिव्यक्तीची संधी मिळाली नाही, तर पारंपरिक गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्याचे महत्त्वही समजले. शाडू मातीच्या मूर्तींचे विसर्जन केल्यानंतर पर्यावरणावर होणारा परिणाम तुलनेने कमी असतो. त्यामुळे जलप्रदूषण टाळणे, नद्या व जलस्रोतांचे संवर्धन करणे आणि पर्यावरणपूरक सण साजरे करणे याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण झाली.



या कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांना गणेशमूर्ती निर्मितीची प्राथमिक तंत्रे, मातीला आकार देण्याच्या पद्धती, मूर्तीचे संतुलन राखणे तसेच सजावटीतील कल्पकता याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन मिळाले. विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने आणि कल्पकतेने मूर्ती तयार करताना आपल्या कलागुणांचे दर्शन घडविले.

या उपक्रमासाठी कला शिक्षिका दीप्ती चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मातीची निवड, मूर्तीची रचना व निर्मिती प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. तसेच गुरुकुलमधील इतर शिक्षक व शिक्षिकांनीही विद्यार्थ्यांना आवश्यक सहकार्य केले. समर्थ गुरुकुलचे प्राचार्य सतीश कुऱ्हे यांच्या नियोजनातून आणि क्रीडा संचालक हरिश्चंद्र नरसुडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचे कौतुक करताना संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत आणि प्रशासकीय अधिकारी प्रदीप गाडेकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने आयोजित या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये कला, संस्कृती आणि पर्यावरण संवर्धन यांचा सुंदर संगम घडून आला. 'मातीपासून मूर्ती, पर्यावरणाची जपणूक आणि संस्कृतीचा सन्मान' हा संदेश देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.